cmyk

## संपादकीय

### पुणे तेथे उणेच..उणे!

आजपर्यंत नव्हे कालपर्यंत पुणे शहराची काय ओळख होती? पुणे तेथे काय उणे असे अभिमानाने म्हटले जात होते. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख होती. शिक्षणाचे माहेरघर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची कर्मभूमी म्हणून पुण्याची ओळख होती. या शहराने शौर्याच्या दुर्दम्य शक्तीचे जे दर्शन घडवले होते त्याची इतिहासात नोंद आहे. ऐतिहासिक अनेक सुधारणावादी अथवा प्रबोधनाच्या चळवळी सुरू असणारे एक प्रमुख केंद्र म्हणूनही पुण्याची ओळख होती. विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी म्हणूनही पुण्याचा नावलौकिक सांगितला गेला.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### अमोल मिटकरी यांच्या तोंडाला लगाम घाला- दरेकर

मुंबई-अमोल मिटकरी याने तोंडाला लगाम घालण्याची आवश्यकता आहे. अमोल मिटकरीला अधिकार दिला आहे का तो ऑथॉरिटी आहे का त्यांच्या नेत्यांनी जाहीर करावे. जेणेकरून त्यांनी घेतलेली भूमिका अधिकृत समजू. त्याच्या बोलण्याला अधिकृत समजावे असे मला वाटत नाही. अजित दादा जेव्हा भूमिका मांडतील तेव्हा त्या भूमिकेला महत्व येईल अन्यथा अमोल मिटकरी चा बोलणं हे बोलाची कढी आणि बोलाचा भात असून दुर्लक्ष करणे याचा पलीकडे भाग नाही, असे भाजपचे नेते प्रविण दरेकर यांनी म्हटले आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-७७ | गुरूवार दि.२७ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# उष्णतेची लाट ओसरणार, आता पावसाचे तांडव होणार

## तीन दिवसात पारा खाली; हवामान विभागाची मोठी अपडेट

मुंबई | प्रतिनिधी

यंदा देशभरात उष्णतेची प्रचंड लाट होती. अंगाची लाहीलाही करणारा हा उकाडा होता. त्यामुळे देशभरातील जनता चांगलीच होरपळून निघाली. देशभरातून उष्णतेची लाट संपणार आहे. येत्या ३ दिवसात तापमान ५ डिग्री सेल्सिअसपर्यंत येणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले असून उष्णतेनंतर आता पावसाचे देशात तांडव होऊ शकते, असा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आनंदाची पण काळजी घ्यावी लागणारी ही बाब आहे.

देशातील नागरिकांना येत्या तीन ते चार दिवसात उकाड्यापासून दिलासा मिळणार आहे. चार पाच डिग्री पाराही पडणार आहे. उत्तर भारतात तीन चार दिवसांत पूर्णपणे मान्सून सक्रिय होणार आहे. गरज पडल्यास पाच दिवस आधीच अलर्ट जारी केला जाईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे. उत्तर भारतापासून ते दक्षिण भारतापर्यंत सर्वत्र हेच चित्र होतं. मात्र, आता दक्षिण भारतातील अनेक राज्यात रिमझिम पाऊस सुरू झाला आहे. हवामान विभागानेही एक महत्त्वाची गुड न्यूज दिली आहे. तीन दिवसात उष्णतेची लाट कमी होऊन सर्वत्र पावसाचे आगमन होणार

पान २ वर





### वीजांच्या कडकडाटाने मृत्यू

अर्थव्यवस्थेबाबत आम्ही काही बोलू शकत नाही. पण चांगले पिक यावे म्हणून आमचे प्रयत्न सुरू आहेत. कृषी मंत्रालयासोबत वारंवार चर्चा होत आहे. झारखंड, बंगाल, राजस्थान, उत्तराखंड आणि बिहार आदी राज्यात विजांचा प्रचंड कडकडाट होत असतो. त्यामुळे मृत्यूंचे प्रमाण वाढलं आहे. येणाऱ्या तीन चार दिवसात बिहार, झारखंड आणि उत्तराखंडमध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस यणार आहे. त्यानंतर ५ जुलैनंतर दक्षिण राजस्थानमध्ये मान्सून दाखल होईल, असेही त्यांनी सांगितले.

### पावसाचा पॅटर्न कसा राहील?

यावेळी नॉर्मल ते धुवांधार पाऊस पडू शकतो. चार ते सहा टक्के अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. यंदा एखाद्या भागातच सर्वाधिक पाऊस होणार नाही. काही भागात सर्वसाधारण पाऊस राहील तर काही भागात अधिक पाऊस राहील. उत्तर पश्चिमेचा थोडा भाग आणि पूर्व भारताच्या काही भागात कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. इतर भागात पाऊस सामान्य ते अधिक होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान खात्याने दिली आहे.

### या भागात पाऊस येतोय

मान्सून गुजरात आणि मध्यप्रदेशातील काही भागांच्या दिशेने पुढे सरकला आहे. दक्षिण-पूर्व राजस्थानच्या काही भागात आणि पश्चिम उत्तर प्रदेशाच्या दक्षिण भागात सुद्धा मान्सूनने दस्तक दिली आहे. देशातील अनेक भागात जोरदार पाऊस होत आहे. ४-५ दिवसात पश्चिमी तट आणि पूर्वोत्तर भारतात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर येत्या ३-४ दिवसात पश्चिम, मध्य आणि पूर्व भारतातील भागात आणि उत्तर पश्चिम भारतातील काही भागात दक्षिण-पश्चिम मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असण्याची संभावना आहे.

### विरोधी पक्षाचे सर्वच आमदार निलंबित

चेन्नई : तामिळनाडू विधानसभेतून मोठी बातमी समोर आली आहे. तामिळनाडू विधानसभेत विरोधी पक्षाला संपूर्ण सत्रासाठी निलंबित करण्यात आलं आहे. विधानसभेतील विरोधी पक्ष अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम पक्षाच्या सर्व ६२ आमदारांना संपूर्ण सत्रासाठी निलंबित करण्यात आले आहे. विषारी मद्य प्रकरणी बुधवारी विधानसभेत मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. यानंतर तामिळनाडू विधानसभेने बुधवारी विरोधी पक्षनेते एडप्पादी के. पलानीस्वामी आणि पक्षाच्या सर्व आमदारांना संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्याचा ठराव मंजूर केला. हा निर्णय तामिळनाडूचे सभापती एम. अप्पावू यांच्या निर्देशानुसार घेण्यात आला आहे.

# पंकजा मुंडेंच्या नेतृत्वात भाजपला विधानसभेला ओबीसी तारणार!

## जरांगे फॅक्टरच्या भितीने मोदी-शहा महाराष्ट्रात सावध पाऊल टाकणार

विशेष प्रतिनिधी/बीड

गेल्या १० वर्षापासून राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपला सध्या बॅकफुटवर यावे लागले आहे. यात देवेंद्र फडणवीस यांचे काही निर्णय आणि त्यातून उदयास आलेल्या जरांगे फॅक्टरमुळे लोकसभेत गतवेळीपेक्षा अर्ध्यावरसुध्दा भाजपला राज्यात जाता आले नाही. त्यामुळे विधानसभेला मोदी-शहा महाराष्ट्रात फडणवीसांना बाजूला सारत निष्ठावंत आणि जुन्या नेत्यांना बळ देणार असल्याचे संकेत आहेत. तसेच ओबीसींना सोबत घेण्यासाठी जे करता येईल ते करण्याची तयारी भाजपची असल्याचे दिसते. त्यामुळे पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वात ओबीसी भाजपला विधानसभेत तारणार असल्याचे म्हटले जात आहे.





गेल्या १० महिन्यापुर्वी राज्यात सामाजिक एकता होती, सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत होते. मात्र मराठा-ओबीसी संघर्षानंतर राज्यात सामाजिक सलोख्याचा प्रश्न निर्माण झाला. एकमेकांना निवडणुकीत पाडण्याच्या भाषा मराठा आणि ओबीसींमध्ये सुरु झाल्या. लोकसभा निवडणुकीत महायुतीला याचा मोठा फटका बसला. तर महाविकास आघाडीला याचा फायदा झाल्याने अर्ध्यापेक्षा जास्त जागा त्यांच्या निवडून आल्या. निकालानंतर जरांगे फॅक्टरने महाराष्ट्रात महायुतीला फटका बसला असल्याचे सिध्द झाले. मनोज जरांगे यांच्यामुळे मराठवाड्यातील आठपैकी ७ खासदार निवडून आल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला. जरांगे यांनी पुन्हा उपोषण सुरु करुन सरकारला घेरण्यास सुरुवात केली. तर दुसरीकडे लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी वडीगोद्रीत उपोषण सुरु करुन राज्यातील ओबीसींची एकजूट केली. याला कारणही पंकजा मुंडे यांच ठरल्या. त्यांनी उपोषणाला भेट दिल्यावर या आंदोलनाकडे संपुर्ण राज्याचे लक्ष गेले आणि वडीगोद्रीत ओबीसी समाजाची गर्दी होऊ लागली. नेत्यांच्या रांगा हाके आणि वाघमारे यांना भेटण्यासाठी लागल्यावर ओबीसींचा राज्य सरकारवर दबाव वाढला आणि पुढे त्यातून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, छगन भुजबळ, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, अतुल सावे, गिरीष महाजन, प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर आदि उपस्थित होते. या बैठकीत पंकजा मुंडे यांची महत्वाची भुमिका होती. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर

पान २ वर

### स्व. मुंडे साहेबांचा फार्मुला पंकजांना स्विकारावा लागेल

पंकजा मुंडे यांनी ओबीसींचे नेतृत्व केले तर राज्यातील ओबीसीमधील इतर जातीमधील नेत्यांनाही बळ मिळेल. धनगर, माळी, साळी, बंजारा यासह इतर जातींमध्ये नेतृत्व तयार करायला हवे, अशी अपेक्षा आहे. गोपीनाथ मुंडे यांनी प्रत्येक जिल्ह्यात ओबीसीमधील बहुतेक जातींमध्ये तालुका आणि जिल्हास्तरावर नेतृत्व तयार केले होते. तोच फार्मुला पंकजा मुंडे यांना स्विकारावा लागेल.

## वीज पडून चकलांबा येथील तीन महिला जागीच ठार तर एक महिला गंभीर जखमी

बीड | प्रतिनिधी

शेतात खुरपणी करत असलेल्या चार महिलांच्या अंगावर वीज कोसळल्यामुळे झालेल्या दुर्घटनेत तिन महिलांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीरित्या जखमी झाल्याची घटना गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे घडली आहे. या घटनेमुळे चकलांबा गावावर शोककळा पसरली आहे.



गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे खुरपणी करीत असताना शकलांबा गावच्या पश्चिम

पान २ वर

### निलेश लंकेंच्या खांद्यावर नितीन गडकरींचा हात

नवी दिल्ली : निलेश लंके अहमदनगरमध्ये विजयाचा झेंडा रोवून, दिल्लीत पोहोचले. निलेश लंके त्यांच्या राहणीमानामुळे, वक्तव्यांमुळे कायमच चर्चेत असतात. कोरोना काळात तर त्यांनी केलेल्या कामांमुळे देशभरात त्यांचा डंका वाजला. शपथविधी दरम्यान निलेश लंके हे देशाच्या नाक्यानाक्यावर चर्चेचा विषय ठरले. लोकसभेत खासदारांच्या शपथविधीचा सोहळ्यात निलेश लंकेंनी इंग्रजीत शपथ घेतली. आता निलेश लंकेचा सध्या एक फोटो चांगला चर्चेत आला आहे. या फोटोमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी निलेश लंकेंच्या खांद्यावर हात ठेवला आहे.



## नदी पात्राला संरक्षण भिंत बांधण्यासाठी १६ कोटी रूपयाचा निधी मंजूर-आ.सुरेश धस

आष्टी | प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघामधील शहरालगत वाहणाऱ्या प्रमुख नद्या त्याचबरोबर छोट्या खेडेगावातून वाहणाऱ्या मोठ्या नद्या यामुळे नदीपात्रालगत शहराची मुख्य बाजारपेठ त्याचबरोबर मंदिर परिसर तसेच स्थानिक रहिवासी आपत्कालीन परिस्थितीमध्ये नदीच्या वाढत्या पाण्यामुळे पुराचा मोठ्या प्रमाणावर होणारा धोका लक्षात घेता यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून आष्टी मतदारसंघासाठी संरक्षण भिंत उभारणे यासाठी महाराष्ट्र शासनाने १६ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे असल्याची माहिती आ.सुरेश धस यांनी दिली आहे.



या मध्ये आष्टी शहरातून वाहणाऱ्या तलवार नदीच्या पात्रास दुतर्फा संरक्षण भिंत बांधकाम करणे ५ कोटी रु. मौजे वाळुंज ता.आष्टी येथे तलवार नदीलगत भैरवनाथ मंदीर परिसरास संरक्षण भिंत बांधकाम करणे ३ कोटी रु.पाटोदा

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक : आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| ज्वारी/हायब्रिड : १६.०० क्विंटल | २,११० | २,७०० | २,४०४ |
| मूग : १.५० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| तूर : १४.५० क्विंटल | ८,१०० | ११,०५० | ९,९६६ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ७.५० क्विंटल | २,३८० | २,७७० | २,५३४ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ३१३.०० क्विंटल | ४,५०० | ४,५४१ | ४,५०८ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ४,३०० | ६,२०० | ५,३३३ |

## हाके, वाघमारे आज बीड जिल्ह्यात

### गोपीनाथगडानंतर भगवानगडावर घेणार आशिर्वाद





बीड | प्रतिनिधी

ओबीसी योध्दे लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे आपले उपोषण सोडल्यानंतर ओबसी अभिवादन दौरा सुरु केला आहे. दि. २६ जून रोजी जालना, सिंदखेडराजा, पोहरादेवी आणि दि. २७ जून रोजी परळी येथील गोपीनाथगड येथे स्व. गोपीनाथ मुंडे यांचा व त्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील भगवानगड

पान २ वर

## अखेर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडेंची बदली

### अविनाश पाठक नवे कलेक्टर; लोकसभा निवडणुकीत ठरल्या होत्या वादग्रस्त





बीड | पतिनिधी

राज्यातील लक्षवेधी आणि अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या लढतींमध्ये बीड लोकसभा मतदारसंघाची लढत झाली. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे विरुद्ध महायुतीच्या पंकजा मुंडे यांच्यात थेट सामना रंगला होता. सुरुवातीला सहजसोपी वाटत असलेली बीडची निवडणूक अत्यंत रंगतदार झाली. मात्र, निवडणूक प्रचारात बीड मतदारसंघात जातीय तेढ पाहायला मिळाले. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे केंद्रस्थानच बीड जिल्हा बनले

पान २ वर

# ओबीसी लढ्याला बळ मिळणार; सगेसोयरेचा अध्यादेश रद्द करा

## प्रकाश आंबेडकरांचा ओबीसींच्या सुरात सूर, मनोज जरांगे यांना मोठा धक्का

संभाजीनगर | प्रतिनिधी

सगेसोयरेबाबतच्या मनोज जरांगे यांच्या मागणीला आता ओबीसी नेत्यांपाठोपाठ वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचाही विरोध असल्याचे बघायला मिळत आहे. सगसोयरेचा अध्यादेश रद्द करा, अशी मागणी केल्याने प्रकाश आंबेडकरांचा ओबीसींच्या सुरात सूर असल्याचे दिसत असून मनोज जरांगे यांना मोठा धक्का मानला जात आहे.





छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात जिल्हास्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजण करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून पक्षाने दिलेले ११ ठराव मांडण्याचे आणि त्या ठरवाचे बॅनर शहरातील मुख्य चौकात लावण्याचे निर्देश पक्षाच्या वतीने देण्यात आले आहेत. या ठरवामध्ये आरक्षणाच्या संदर्भात वंचित बहुजन आघाडीची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात आरक्षणावरून पेटलेल्या मराठा विरुद्ध ओबीसी वादाच्या संदर्भातही काही ठराव घेण्यात आले आहेत. या ठरावात सगेसोयरेबाबत मोठं वक्तव्य करण्यात आलं आहे. वंचित बहुजन आघाडीने सगसोयरेचा अध्यादेश रद्द करण्यात यावा, अशी मागणी या ठरावाद्वारे केली आहे. त्यामुळे आता या मुद्द्यावरुन राजकारण तापण्याची शक्यता जास्त आहे.

शासकिय यंत्रणेकडून मिळालेले जात प्रमाणपत्र हा एक महत्त्वपूर्ण अधिकृत दस्तावेज आहे.

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पुणे तेथे उणेच..उणे!

आजपर्यंत नव्हे कालपर्यंत पुणे शहराची काय ओळख होती? पुणे तेथे काय उणे असे अभिमानाने म्हटले जात होते. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख होती. शिक्षणाचे माहेरघर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची कर्मभूमी म्हणून पुण्याची ओळख होती. या शहराने शौर्याच्या दुर्दम्य शक्तीचे जे दर्शन घडवले होते त्याची इतिहासात नोंद आहे. ऐतिहासिक अनेक सुधारणावादी अथवा प्रबोधनाच्या चळवळी सुरू असणारे एक प्रमुख केंद्र म्हणूनही पुण्याची ओळख होती. विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी म्हणूनही पुण्याचा नावलौकिक सांगितला गेला. आज काय स्थिती आहे? पुणे शहर पूर्णत: बदलले आहे. पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. या पाण्यात 'पुणे शहर राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक केंद्र' असा असणारा नावलौकिक वाहून गेला आहे.

पुणे शहराचा नावलौकिक धुळीस मिळण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे गत काही वर्षांपासून प्रचंड वाढलेली गुन्हेगारी त्यात भरीस भर म्हणजे अमली पदार्थांच्या पार्ट्या, या नशेच्या गर्तेत अडकत चाललेली तरुणाई! पुणे ही शिक्षणाची पंढरी आणि संस्कृती जपणारे शहर म्हणून ओळखले जायचे. पण गत काही महिन्यांपासून पुण्यात घडत चाललेल्या घटनांमुळे पुण्याची संस्कृती लयाला गेली की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. पुण्यातील हडपसरमध्ये एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्काराची घटना घडली. विशेष म्हणजे खुद्द मुलीचे वडील, काका आणि चुलत भावाने हा बलात्कार केल्याची तक्रार मुलीच्या आईने केली. कुठे गेले संस्कार? पुण्यात 'हिट अँड रन' प्रकरण तर भलतेच गाजते आहे. पोर्शे अपघाताचे प्रकरण ताजे असतानाच पुणे-नाशिक महामार्गावर दुचाकी आणि कारचा भीषण अपघात झाला. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पुण्यातील खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील यांच्या पुतण्याने कारखाली दोघांना चिरडले. यात एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला. आमदाराचा पुतण्या दारूच्या नशेत गाडी चालवत होता म्हणे.

अपघातानंतर पुतण्या मयूर गाडीतच बसून राहिला. तो गाडीबाहेर आला नाही आणि त्याने जखमींना मदतही केली नाही. कुठे गेली माणुसकी? पुण्यात ड्रग्ज पार्ट्याही जोरात चालत आहेत. पुण्यातील फर्ग्युसन रोडवरील हॉटेल, पबमध्ये तरुण-तरुणी ड्रग्ज व अमली पदार्थाचे सेवन करत पार्टी करतात. पुण्यातील 'एल-३' हॉटेलमधील पार्टीत ड्रग्ज घेणा-या तरुणांचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हीडीओमध्ये हॉटेलमधील वॉशरूममध्ये अल्पवयीन मुले ड्रग्ज घेत असल्याचे दिसून आले. पुण्यातील पोर्शे कार अपघाताने राज्य सरकारची अब्रू निघाली आहे. सारे नियम धाब्यावर बसवून पुण्यात पहाटेपर्यंत पबवाले अल्पवयीन मुलांना दारू कशी पुरवतात ते उघड झाले आहे. कधीकाळचे पुणे, सांस्कृतिक पुणे आता गुंडगिरीसाठी बदनाम झाले आहे. गुंडगिरीला राजाश्रय आहे हे आता लपून राहिलेले नाही. पोर्शे कार अपघातातील बालकाला वाचवण्यासाठी अजित पवार गटाचे आमदार पहाटे पोलिस ठाण्यात पोहोचले होते. हे सारे संतापजनक आहे.

विशेष म्हणजे अजित पवार यांनी आमदाराचीच बाजू घेतली होती. निवडणुकीत जनतेसमोर हात पसरून मतांची याचना करणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर माजतात आणि उद्दामपणे वागणा-या आपल्या नातेवाईक तसेच कार्यकर्त्यांच्या गैरवर्तणुकीला संरक्षण देतात. गावागावांत लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते हुल्लडबाजी करतात, त्यामागे आपल्याला वाचवणारे कुणीतरी आहे ही भावनाच या कार्यकर्त्यांना तसे करण्यास प्रवृत्त करत असते. पुण्यात दरवर्षी लाखो विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठीही हजारो विद्यार्थी येतात. परंतु ड्रग्जच्या आहारी जाणा-या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत चालली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून करिअर, शिक्षण घेणारे विद्यार्थीही कळत-नकळत या ड्रग्जच्या आहारी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या विद्यार्थ्यांचे भवितव्य वाचवण्याची गरज आहे. पुणे शहर ड्रग्जच्या विळख्यात अडकत चालले आहे. त्यामुळे अनेक पिढ्या बरबाद होऊ शकतात त्यामुळे वेळीच ड्रग्जचा विळखा सोडविण्याची गरज आहे. महाराष्ट्राचा 'उडता पंजाब' होऊ द्यायचा नसेल तर ड्रग्ज माफिया, बेकायदेशीर पब्ज व्यवसाय, मटका, जुगार, गांजा विक्री अशा बेकायदेशीर व्यवसायांवर बुलडोझर फिरवावा लागेल. राजकीय व प्रशासकीय वरदहस्त असल्याशिवाय कुठलेही काळे धंदे सुरू राहू शकत नाहीत. राज्यात विविध प्रकारचे माफिया निर्माण झाले आहेत त्याला संपूर्णपणे राजकीय, प्रशासकीय व्यवस्थाच जबाबदार आहे. लोकशाही व्यवस्थेत सर्वांत महत्त्वाची भूमिका असते ती लोकप्रतिनिधींची. तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले असतील तर त्यांचा धाक प्रशासनावर राहत नाही आणि प्रशासन देखील 'वसुली'त मग्न राहिल्याने काळे धंदे करणा-यांवर धाक उरत नाही. 'कोयता गँग'च्या विविध घटना समोर येऊन देखील प्रशासनाला, पोलिस यंत्रणेला 'कोयता गँग'चा बंदोबस्त करता आला नाही.

याचे मुख्य कारण म्हणजे समाजातील गुंडांचे लोकप्रतिनिधी कनेक्शन! पोलिस यंत्रणा राजकारण्यांच्या हातातील कळसूत्री बाहुली बनल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाशिवाय कुठल्याच प्रकरणात साधा एफआयआरदेखील नोंदवला जात नाही. त्यामुळे राज्यात उघडपणे बेकायदेशीर मद्यालये, देशी दारूची दुकाने, मटका, जुगार, ऑनलाईन जुगार, पार्लरच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय अशा गोरखधंद्यांची चलती आहे. या प्रत्येकाचे हप्ते स्थानिक पोलिस प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना असल्याशिवाय असे धंदे चालू शकत नाहीत. युवा पिढीला नशेच्या विळख्यातून वाचवण्यासाठी सरकारने कठोर कारवाई करण्याची गरज आहे. सध्यातरी तशी प्रामाणिक राजकीय, प्रशासकीय इच्छाशक्ती दिसत नाही. सध्या पुण्यात जे काही चालले आहे त्यावर पुणेकरांना 'कशी नशिबाने थट्टा आज मांडली' असे म्हणायची वेळ आली आहे. कालपरवापर्यंत 'पुणे तेथे काय उणे' असे म्हटले जायचे आज 'पुणे तेथे उणेच उणे' असे म्हणावे लागत आहे.

# 'नीट' पेपरफुटीत ३०० कोटींची उलाढाल!

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**बिहार लोकसेवा आयोगाने शिक्षक भरतीसाठी घेतलेल्या परीक्षेचे तसेच ओडिशात ज्युनिअर इंजिनिअर पदांच्या भरतीसाठी घेतलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फोडणा-या विशाल चौरसिया यानेच नीट-यूजीचीही प्रश्नपत्रिका फोडली असण्याची शक्यता आहे, असा दावा बिजेंदर गुप्ता याने केला.**

एका नियतकालिकाने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये त्याने प्रश्नपत्रिका फोडणा-यांबद्दल सांगितले की, 'वो जेल जायेंगे, फिर बेल और फिर शुरू होगा खेल'. नीट-यूजीची प्रश्नपत्रिका फोडून ती ७०० विद्यार्थ्यांना देण्यात येणार होती. त्यातून सुमारे २०० ते ३०० कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता होती असाही दावा गुप्ता याने केला. बिजेंदर गुप्ता याआधी काही परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फोडण्याच्या गुन्ह्यांत सहभागी होता. त्याला पोलिसांनी दोनदा अटक केली होती. बिजेंदर गुप्ता याने सांगितले की, नीट-यूजीची प्रश्नपत्रिका फोडण्याच्या प्रकरणातील सूत्रधार संजीव मुखिया बेपत्ता असून तो कदाचित पोलिसांच्या हाती लागणार नाही. या प्रकरणात बिहार पोलिसांच्या ईओयूचा तपास योग्य दिशेने सुरू होता. स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका जिथे छापल्या जातात त्या सरकारी मुद्रणालयातील कर्मचा-यांशी संधान साधले जाते तसेच या परीक्षा यंत्रणेतील काही लोकांना हाताशी धरण्यात येते. मग प्रश्नपत्रिका फोडल्या जातात. परीक्षा यंत्रणेतील गैरव्यवहारांमुळे काळ्या यादीत टाकण्यात आलेल्या कंपन्याही निविदा प्रक्रियेमध्ये चुकीच्या गोष्टी घडवून आणण्यास मागेपुढे पाहात नाहीत. बिजेंदर गुप्ता याने सांगितले की, प्रश्नपत्रिका फोडण्यामध्ये कुख्यात असलेला एक गुंड उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील रहिवासी आहे. त्याचा साथीदार म्हणून मी काम केले होते. एका उमेदवाराला आम्ही प्रश्नपत्रिका फोडून नंतर नोकरी मिळवून देण्यासाठी मदत केली. या प्रकरणात आम्हाला तुरुंगात जावे लागले होते. आता हा गुंड उत्तर प्रदेशमध्ये आमदार आहे, अशी माहिती ब्रिजेंद्र गुप्ता याने दिली. परीक्षा माफिया गुप्ता याने दावा केला की, बिहारमधील प्रश्नपत्रिका फोडण्याच्या प्रकरणाचा सूत्रधार संजीव मुखिया हा गेल्या १० वर्षापासून कर्जात बुडालेला आहे. त्याच्यावर सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज आहे. मात्र प्रश्नपत्रिका फोडण्याचे गुन्हे तो करतच राहिला. शिक्षक भरतीसाठी बिहार लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडल्याबद्दल संजीव मुखियाचा मुलगा शिव याला याआधीच अटक करण्यात आली आहे.

# रामनगर, पाडळी विद्यार्थ्यांसाठी बस सेवेचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी एसटी बस नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणात होत होते त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहत होते रामनगर येथील पालकांनी प्राचार्य अगंदराव दहिफळे यांच्यासमोर एसटी बस सेवा सुरू करावी अशी मागणी केली होती प्राचार्य अगंदराव दहिफळे यांनी यांनी अथक परिश्रम घेऊन रामनगर ते पाडळी ही बस सेवा मंजूर करून घेतली रामनगर ते पाडळी विद्यार्थ्यांच्या बस सेवेचा शुभारंभ आज २६ जुन रोजी प्राचार्य दहिफळे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला यावेळी चालक वाहकांचा



सत्कार करून ग्रामस्थांनी आभार मानले यावेळी पालक श्रीराम सानप दीपक डोंगरे सर्जेराव सानप जानराव डोंगरे प्रशांत सानप रवींद्र डोंगरे बाजीराव डोंगरे आदि सह विद्यार्थी व सर्व कर्मचारी उपस्थित होते प्रत्यक्षात बस सेवा सुरू झाल्यामुळे विद्यार्थी आनंदून गेले होते बस सेवा सुरू केल्यामुळे विभाग नियंत्रक अजयकुमार मोरे आगार व्यवस्थापक अमोल भुसारी वाहतूक निरीक्षक विकास खेडकर वाहतुक नियंत्रक नितीन परजणे व्यवस्थापक राजेश केदार आदींनी मोठे परिश्रम घेतले त्यामुळे प्राचार्य अगंदराव दहिफळे व रामनगर ग्रामस्थांनी आभार मानले.

## अमरनाथ यात्रेसाठी ऑफलाइन नोंदणी सुरू


वाराणसी । वृतसंस्था

जम्मू-काश्मीरमध्ये २९ जूनपासून बाबा अमरनाथ यात्रा सुरू होत आहे. यासाठी ऑनलाइन नोंदणीनंतर आता ऑफलाइन नोंदणीही केली जात आहे. स्वत:ची नोंदणी करण्यासाठी शिवभक्तांना आधार कार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसन्स आणि पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राची आवश्यकता असेल.याशिवाय, सर्व वयोगटातील लोकांना आरोग्य प्रमाणपत्र सादर करणे देखील बंधनकारक आहे. अमरनाथ यात्रेकरू या कागदपत्रांसह विहित शुल्क जमा करून स्वत:ची नोंदणी करू शकतात. बाबा विश्वनाथांची नगरी असलेल्या वाराणसी येथून मोठ्या संख्येने भाविक दरवर्षी बाबा अमरनाथला भेट देतात. यावेळीही यात्रेला जाण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी नोंदणी केली आहे. बम-बम भोलेच्या घोषणांनी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.अमरनाथ यात्रेला दरवर्षी देशभरातून हजारो भाविक जातात. यावेळी ही यात्रा २९ जूनपासून सुरू होऊन १९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यासाठी पहिली तुकडी २८ जून रोजी जम्मूतील भगवती नगर बेस कॅम्प येथून काश्मीर खो-यासाठी रवाना होणार आहे. १५ एप्रिलपासून यात्रेसाठी ऑनलाइन नोंदणी केली जात आहे. आता ऑफलाइन नोंदणीही सुरू झाली आहे. दरम्यान, आज अमरनाथ यात्रेची ट्रायल रन जम्मू बेस कॅम्पवर घेण्यात आली. जम्मूचे विभागीय आयुक्त रमेश कुमार, एडीजीपी जम्मू आनंद जैन आणि इतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. अमरनाथ यात्रेच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत उधमपूरचे उपायुक्त सलोनी राय यांनी सांगितले की, सुरक्षा व्यवस्था कडेकोट आहे. आम्ही सर्व यात्रेकरूंची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करू. आम्ही उधमपूरमध्ये ६ हजार यात्रेकरूंना राहता येईल अशी २६ निवास केंद्रे बनवली आहेत. तयारीवर लक्ष ठेवण्यासाठी सेटलमेंट सेंटरवर नोडल अधिकारी तैनात करण्यात आले आहेत.

# पीएम किसान योजनेचे अनुदान तात्काळ मंजूर करा नसता रास्ता रोको करू-भाई गंगाभीषण थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**पी. एम. किसान योजनेचे अनुदान तात्काळ मंजूर करा तसेच ज्या शेतकऱ्याचे एक दोन हप्ते मिळून ही हप्ते बंद करण्यात आले आहे त्यांची तात्काळ हफ्ता सुरू करावेत नसता रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाई गंगा भीषण थावरे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिला आहे.**



या निवेदनात पुढे म्हटले आहे की केंद्र शासनाकडून पी.एम.कीसान योजनेचे रक्कम ही लाभार्थी शेतकऱ्यांना मिळत होती. परंतू काही लाभार्थ्यांना एक-दोन हप्ते मिळाल्यानंतर त्यांची पी. एम. किसान योजनेचे हप्ते बंद करण्यात आले होते. तरी बंद करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ हप्त्याची वाटप करावी तसेच त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता चालू आहे त्यांना तात्काळ हफ्ता देण्यात यावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे तसेच हा हप्ता का देण्यात यावा याविषयी एक उदाहरण देण्यात आले असून त्यात. माजलगांव मतदार संघामध्ये कमीत कमी २५ ते ३० हजार लाभार्थ्यांचे पी.एम. किसान योजनेचे फॉर्म पडून आहेत, परंतू सदरील फॉर्म हे लाल फितीच्या अडकले आहेत. यास जबाबदार आपले कार्यालय आहे. असा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. कार्यालयातील अधिकारी व माजलगांव कृषी कार्यालयातील अधिकारी हे कागदोपत्री खेळ करतात व म्हणतात की, कागदपत्रे वर गेली, मंजूरी ही दिल्ली येथून येते, असे उडवाउडवीचे उत्तरे देवून शेतकऱ्यांची चेष्टा उडविली जाते याचा जाब विचारायला कोणी तयार होत नाही. तरी आपण यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून हजारों लाभार्थ्यांना याचा लाभ मिळवून देण्यासाठी याची एक बैठक आपल्या दालनामध्ये लावावी, त्यामध्ये प्रत्येक तालुक्यातील कृषी अधिकारी, आपल्या कायालयातील कर्मचारी व शतकरी प्रतिनिधी यांना या बैठकीत बोलवण्यात यावे अशी मागणी या निवेदनात करण्यात आली म्हणून वरील मागण्याचा काय मंजूर करण्यात यावो नाश्ता दिनांक ०७.०७.२०२४ रोजी कृषी कार्यालय, माजलगांव येथे कुलूप ठोको आंदोलन फारण्यात येईल व दिनांक १५.०७.२०२४ रोजी आपला कार्यालयाच्या गेटवर रास्ता रोको करण्यात येईल याची नोंद घ्यावी अशी विनंती या निवेदनाच्या प्रती सर्व संबंधित कार्यालयाला दिल्या असून या निवेदनावर शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभीषण थावरे यांची सही आहे.



# येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक माटे डी.बी. हे होते .**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त प्रथम त्यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला .त्यानंतर काजल भड, तनिषा डोळस, अमृता कागदे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले . यावेळी प्राचार्य डी.बी. माटे यांनी .शाहू महाराजांच्या कार्याविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांना शालेय जीवनात छत्रपती शाहू महाराजांचे विचार आत्मसात करावे असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.बी.येडे यांनी केले. याप्रसंगी सर्व शिक्षक ,विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.

## पान १वरून...

### उष्णतेची लाट ओसरणार,

असून उष्णतेनंतर आता पावसाचे तांडव काही भागात पहायला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी चांगली बातमी असली तरी काळजी पण करण्यासारखी आहे. पेरण्या झाल्या असून पिके उगवली आहेत. जोराचा पाऊस जर झाला तर त्याचा पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे.

---------

### पंकजा मुंडेंच्या नेतृत्वात ओबीसी भाजपला

त्यांच्यावर भाजप मोठी जबाबदारी देऊ शकते, असे संकेत आहेत. एकंदरीत छगन भुजबळ हे ओबीसींचे मोठे नेते असले तरी ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असल्याने भाजप त्यांच्याऐवजी पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वात ओबीसींची राज्यात वज्रमुठ आवळून विधानसभेत जरांगे फॅक्टरला चेकमेट करण्यासाठी बळ देऊ शकते. गोपीनाथ मुंडे यांच्या त्या कन्या असल्याने राज्यातच नव्हे तर देशातही पंकजा मुंडे यांचे नेतृत्व ओबीसी समाज स्विकारु शकतो, असे म्हटले जात आहे. त्यामुळे ओबीसींना तगडा नेता मिळेल आणि भाजप विधानसभेचे आव्हान यशस्वीरित्या पेलवेल, असे दिसते.

------------

### नदी पात्राला संरक्षण भिंत बाधण्यासाठी १६

शहरातूर जाणाऱ्या मांजरा नदीच्या पात्रास दुतर्फा संरक्षण भिंत बांधकाम करणे ५ कोटी रु.तर मौजे अमळनेर ता.पाटोदा येथे गावलगत जाणाऱ्या लेंडी नदीच्या पात्रास बाजारतळ परिसरास संरक्षण भिंत बांधकाम करणे ३ कोटी रु.असे एकूण १६ कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती आ.सुरेश धस यांनी दिली.यावेळी आ.धस यांनी आपत्ती व्यवस्थापन महाराष्ट्र शासन,बीड जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड व बीड पाटबंधारे विभागाचे विशेष आभार मानले आहेत.

-----------

### चकलांबा येथील वीज पडून तीन महिला

भागात असलेल्या शिवारात वीज पडल्यामुळे बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास खुरपणी करीत असलेल्या चार महिलांच्या अंगावर वीज कोसळली. सदर घटनेनंतर या चारही महिलांना बेशुद्ध अवस्थेत तातडीने बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर महिलांची तपासण्या करताच डॉक्टरांनी तिघी जणींना मृत घोषित करण्यात आले. मृतांमध्ये शालन शेषराव नजन वय (६५), विजया राधाकिसन खेडकर (वय ४५) सौ. लंकाबाई हरिभाऊ नजन या महिलांचा समावेश आहे. तर श्रीमती यमुनाबाई माणिक खेडकर वय ६८ या गंभीररित्या जखमी झाल्या आहे.जिल्हा रुग्णालयामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक अशोक डॉक्टर अशोक बडे डॉक्टर हनुमंत पारखे आणि वैद्यकीय अधिकारी, डॉ. जोगदंड डॉ. सोनल जायभाये यांनी तातडीने तपासणी करून तिघींना मृत घोषित केले. वीज कोसळून झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे चकलांबा आणि परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

------------

### अखेर जिल्हाधिकारी दीपा

होते. त्यामुळे, बीडमध्ये मराठा विरुद्ध वंजारी असा जातीय संघर्ष दिसून आले. या वादामुळे येथील निवडणूक जशी गाजली, तशीच मतदान केंद्रावरील बोगस मतदान आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाच्या आरोपामुळेही बीडची निवडणूक चर्चेत होती. आता, निवडणूक निकालानंतर महिनाभरातच बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. लोकसभा निवडणूक दरम्यान बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने अनेक आरोप केले होते. त्यामुळे, त्या चांगल्याच वादग्रस्त ठरल्या, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून थेट तहसिलदार आणि जिल्हाधिकारी यांना मतमोजणीवेळी सहभागी न होऊ देण्याचीही मागणी केली होती. त्यामुळे, बीडच्या लोकसभा निवडणुकीत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे वादग्रस्त ठरल्या. अखेर दीपा मुधोळ मुंडे यांची बीड जिल्हाधिकारी पदावरुन बदली झाली आहे. अपर मुख्य सचिव नितीन गद्रे यांच्या सहीने दीपा-मुधोळ मुंडे यांची बदली करण्यात आल्याचे पत्र पाठवण्यात आले आहे.

**अविनाश पाठक हे जि. प. चे सीईओ**

बीडच्या जिल्हाधिकारीपदी अविनाश पाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अविनाश पाठक हे सध्या बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते, त्यांची या पदावरून आता बीड जिल्हाधिकारी या पदावर बदली करण्यात आली आहे.

-----------------

### हाके, वाघमारे आज

येथे भगवानबाबांचा सायंकाळी आशिर्वाद घेण्यासाठी जाणार आहेत. ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये म्हणून वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी १० दिवस अमरण उपोषण केले. सरकारबरोबर चर्चा झाल्यावर हे उपोषण सोडण्यात आले. काही दिवस उपचार घेतल्यावर हाके आणि वाघमारे यांनी ओबीसी अभिवादन दौरा दि. २६ जूनपासून सुरु केला आहे. दि. २७ जून रोजी ते दोघेही वैद्यनाथ कारखान्यावर असलेल्या गोपीनाथगडावर जावून गोपीनाथ मुंडे यांचा आशिर्वाद घेणार आहेत. त्यानंतर ते बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांना अभिवादन करणार आहेत. त्यानंतर ते भगवान गडाकडे रवाना होऊन सायंकाळी ६ वा. तेथे पोहचतील. यावेळी ते भगवानबाबांचे व महंत नामदेव शास्त्रींचे आशिर्वाद घेतील. हाके आणि वाघमारे हे येणार असल्याने गोपीनाथगड, बीड आणि भगवानगडावर ओबीसींची मोठी गर्दी होणार आहे.

----------

### ओबीसी लढ्याला बळ मिळणार;

त्यामधे रक्ताच्या नातेवाईकांची (वडील, भाऊ, बहीण, काका, आत्या) जात प्रमाणपत्रे हा एक आवश्यक पुरावा असतो. या अतिशय महत्त्वपूर्ण मानलेल्या पुराव्याला बगल देण्याचे काम 'सगेसोयरें' (रक्ताचे नातेवाईक नसलेल्यांना) जातप्रमाणपत्र देण्याच्या अध्यादेशाद्वारे केलेले आहे. आरक्षण कायदा व नियमावली मधे चुकीची ढवळा ढवळ करण्याची मनमानी सरकार करत आहे. अशा प्रकारे संविधानाची आरक्षण निती आणि आरक्षणा मागिल सामाजिक भूमिकेशी द्रोह करण्याचा अपराध सरकार व आरक्षण विरोधक करताहेत. त्यामुळेच समाजतील सामाजिक सौहार्द आणि बंधुभावाला तडे जात आहेत. जाती समुहात भांडणे लावण्याचे हे षडयंत्र आहे. वंचित बहुजन आघाडी सगसोयरेचा अध्यादेश रद्द करण्यात यावा अशी मागणी या ठरावाद्वारे ही परिषद करीत आहे, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीने घेतली आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

----------------------


## टी.सी.हरवला आहे

कृष्णा लक्ष्मण पुरी या नावाचा १० वी पासचा टी.सी खांडेपारगाव हायस्कूल खांडेपारगाव शाळेचा बीड-खांडेपारगाव प्रवास करतांना हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधा.

**::संपर्क::**

**कृष्णा लक्ष्मण पुरी**

**मु.खांडेपारगाव ता.जि.बीड**

**फोन नंबर ९४०५४५३९५४**

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २७ जून २०२४



## नागनाथ विद्यालय मोरगाव येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी

बीड :-तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक माटे डी.बी. हे होते .

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त प्रथम त्यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला .त्यानंतर काजल भड, तनिषा डोळस, अमृता कागदे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले . यावेळी प्राचार्य डी.बी. माटे यांनी

.शाहू महाराजांच्या कार्याविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांना शालेय जीवनात छत्रपती शाहू महाराजांचे विचार आत्मसात करावे असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.बी.येडे यांनी केले. याप्रसंगी सर्व शिक्षक ,विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.

# ऐतिहासिक स्मारकांच्या दुरूस्तीच्या कामाला मिळाला मुहूर्त

## पुरातत्व विभागाने १७ कोटींच्या खर्चाला दिली प्रशासकीय मान्यता; आ.नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील ऐतिहासिक अशा खोलेश्वर हत्तीखाना अमृतेश्वर मराठीचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी व मुळ जोगाईच्या सभामंडपासाठी पर्यटन खात्याने १६ कोटी ७८ लाख ८६ हजार रूपये खर्च मंजूर केला होता. या मंजूरीला नुकतीच प्रशासकीय मान्यता मिळाल्याने वरील ऐतिहासिकांची रूपडे पालटणार आहे. या ऐतिहासिक स्मारकांच्या दुरूस्ती व जतनासाठी केजच्या आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळे या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

मराठवाड्यातील सांस्कृतिक राजधानी म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. तसेच मराठी भाषेचे उमगस्थान म्हणून देखील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील भाषा तज्ञांचे मत आहे. त्यामुळे अंबानगरी हे ठिकाणी मराठी भाषेची जननी म्हणून ओळखली होती. मराठी भाषेचे आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांनी विवेक सिंधु या ग्रंथाची रचना याच ठिकाणी शहराला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे. ऐतिहासिक महत्व असलेल्या अंबाजोगाई येथील राज्य संरक्षती स्मारकाची दुरावस्था झाल्यामुळे शहराची ओळख पुसली जाते की काय असा संशय व्यक्त केला जात होता. यासाठी आ.नमिता मुंदडा यांनी राज्य संरक्षीत स्मारकाच्या जनत व दुरूस्तीसाठी मागील काही वर्षापासुन शासन दरबारी पाठपुरावा करीत होत्या. त्यानूसार राज्याच्या आर्थिक बजेट मध्ये व लोकसभा निवडणूकीची अचारसंहिता लागण्यापुर्वीच सदरील कामाची निविदा काढण्यात आली. त्याला मंजूरी देत कार्यरंभ आदेश देण्यात आला. लोकसभेची आचारसंहिता संपुष्ठात आल्यानंतर या संरक्षीत स्मारकांच्या दुरूस्ती कामाला आता वेग येवू लागला आहे.







### असा होणार स्मारकावर खर्च

शहरातील ऐतिहासिक स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामातर्गत खोलेश्वर मंदिरासाठी सहा कोटी पाच लाख रूपये, जोगाई सभा मंडप, बडा हत्ती खाना च्या दुरूस्तीसाठी १ कोटी ९३ लाख रूपये, जोगाई सभा मंडप (छोटा हत्ती खाना) च्या दुरूस्तीसाठी १ कोटी ४१ लाख रूपये, अमृतेश्वर मंदिरासाठी ६ कोटी ५३ लाख रूपये आणि आद्यकवी मुकुंदराज स्वामी स्माकाच्या दुरूस्तीसाठी ८४ लाख ८३ हजार रूपये खर्च होणार आहेत. यामुळे या ऐतिहासिक स्मारकाचे नवे रूपडे साकारणार आहे.

### शहरातील ऐतिहासिक वास्तुच्या जतनासाठी शासनाकडे केला पाठपुरावा

अंबाजोगाई शहर हे मराठवाड्यातील सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहराची ओळख पुसते की काय? अशी भिती व्यक्ती होवू लागली होती. या स्मारकाच्या जतनासाठी पुरातत्व विभागाच्या मार्फत रस्ता तयार करून दुरूस्ती व जतनासाठी निधी मिळून देण्यासाठी आपण प्रयत्न केला. यापुढेही शहरातील अशा वास्तुंच्या जतनासाठी प्रयत्नशील राहू.

– सौ.आ.नमिता अक्षय मुंदडा, आ.केज विधानसभा

### संरक्षीत स्मारकाच्या कामासाठी वेगवेगळा कालावधी

अंबाजोगाई शहरात होत असलेली ऐतिहासिक स्मारकाची कामे वेळेत पुर्ण केली जाणार आहेत. परंतु यासाठी प्रत्येक कामाला वेगवेगळा कालावधी दिला गेला आहे. कार्यरंभ आदेशाच्या पुढील १२ महिन्याच्या कालावधीत ही कामे पुर्ण होतील अशी आशा अंबाजोगाईकरांना आहे.

### गुणवत्तापुर्वक साहित्य वापरले जाणार

ऐतिहासिक वास्तुची जतन करण्यासाठी व दुरूस्तीसाठी दगड, दगडी फरशी वाळु, चुना, मुरूम विटा, लाकुड व इतर आवश्यक घटक गुणवत्तापुर्वक असणारीच वापरली जाणार आहे. बांधकामासाठी वापरण्यात येणार्या विटांचे व दगडांचे, भरीव दगडी फरशांचे नमुने तयार करून त्याची पुरातत्व खात्याकडून परवानगी घेवूनच वापरली जाणार आहेत.

*उकिर्डा चकला येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती*

## दादासाहेब सादोळकर यांनी कथा, कवितांतून दिला संदेश

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील उकिर्डा चकला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५० जयंती निमित्ताने दि.२६ रोजी अभिवादन करण्यात आले.



छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या आचरणातून समतेचा संदेश दिला. रयतेच्या कल्याणासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले. बहुजनांतील जातीभेद घातक असुन वंचितांना विविध क्षेत्रात संधी मिळाली पाहिजे असे लेखक दादासाहेब सादोळकर यांनी सांगितले. बालकथा आणि कवितांच्या माध्यमातून मुलांचे रंजन केले. तर मुलांनी उत्स्फूर्त दाद दिली. साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांनी थोर समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. शाहू राजांनी सामाजिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यातून दीन-दलितांचा उद्धार केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय यांची पायाभरणी केली असे सांगितले. यावेळी सुग्रीव नेटके, मुख्याध्यापक भरत ढाकणे, सुरेखा खेडकर, साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव, बाळू दराडे यांचेसह विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचलन आरती लाटे यांनी केले.

## छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर व समुपदेशन मेळाव्याचे आ.पवारांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**गेवराई | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांनी आपले करिअर कसे घडवावे यासाठी महायुती सरकारकडून कौशल्य विकास रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या खात्या कडुन सुशिक्षित बेरोजगार युवकांना कौशल्य विकास रोजगार योजनेंतर्गत मार्गदर्शन करण्यात येत असते



त्या अनुषंगानेच आज दिनांक २५ जून २०२४ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेवराई या संस्थेतर्फे छत्रपती शाहू महाराज युवा करियर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन गेवराई मतदार संघाचे आमदार लक्ष्मण पवार यांच्या हास्ते संपन्न झाले आहे

यावेळी तहसीलदार संदीप खोमणे,प्रचार्य शिवाजी बनगे, डॉ.अनिल जाधव,अकुश शिदे,राहुल नावंदर,रामदासी पवन, ना. मंगलप्रभात लोढा यांचे पि.ए.जोशी, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, कोकाटे एम.डी,पोपळे एम.एल.,कानाडे ए.जी.,नाटकर ऐ.आर.,राऊत एस.पी.,शेख ए.एच.,आदे जी.जी.,वाघमारे जी.आर.,आतकरे एस.एल.विटकर एम.सी.,शिदे एन.एन.शेख अरशद, शेख इरफान, इंगोले,वाव्हळ,मुळे,पटवी,जाधव, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास गेवराई येथील व परिसरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी व सुशिक्षित बेरोजगार मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमांमध्ये युवकांना व युवतींना आपले करिअर कसे घडवावे करिअरची निवड कशी करावी मुलाखत तंत्र कलात कल चाचणी व व्यक्तिमत्व विकास कशाप्रकारे साध्य करावा याविषयी तज्ञ मार्गदर्शक यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी गेवराई येथील तहसील कार्याचे तहसीलदार व इतर प्रतिष्ठित व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम आयोजित करण्यामागे असलेली शासनाची भूमिका याविषयी संस्थेचे प्राचार्य श्री शिवाजी बनगे प्राचार्य शासकीय आयटीआय गेवराई यांनी उपस्थित युवक युती यांना मार्गदर्शन केले हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेवराई या संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध प्रयत्न करून मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केला

## छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी

**वडवणी | प्रतिनिधी**

वडवणी येथील छत्रपती राजर्षी शाहु महाराज विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांची १५०वी जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मु.अ/प्राचार्य. श्री सानप बी.व्ही,प्रमुख पाहुणे श्री.कुरकुटे आय.जी सर.,प्रा.शेळके आर.डी मॅंडम होते,यावेळी विद्यालयातील विद्यार्थी चि.अंजिक्य काळे नी शाहु महाराजांची वेशभुषा करून सर्व विद्यालयातील विद्यार्थ्यांचे लक्ष वेधुन घेतले,तसेच यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाहु महाराज यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांनी छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांच्या कार्याचे विद्यार्थ्यांना अवलोकन करुन दिले,कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री . सानप सरांनी शाहु महाराजांचे जीवन ,त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना समजुन सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री महानवर एस.बी.सर आणि आभार प्रदर्शन प्रा.संदलापुरकर व्ही.पी यांनी केले,तसेच यावेळी विद्यालयातील शिक्षक,प्राध्यापक वृंद ,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## विजेच्या धक्क्याने बैल ठार शेतकऱ्याचे लाखाचे नुकसान

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील कासेवाडी येथिल ऊसतोड मजूर बाबु हौसराव सानप या तरून शेतकऱ्याच्या बैलाला विजेचा धक्का लागल्याने बैलाचा मृत्यू होऊन शेतकऱ्याचे लाखाचे नुकसान झाले आहे. हि घटना आज दि. २६ जुन रोजी सकाळी १० :३० वा. च्या सुमारास घडली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, कासेवाडी येथिल युवक शेतकरी बाबु हौसराव सानप हा शेती बरोबरच ऊसतोडणीचे काम करतो. अल्पभूधारक असल्याने इतर शेतकऱ्यांची शेती देखील मजुरी करतो. आज सकाळी मारोती दगडू सानप यांच्या शेतात मशागतीची काम करत असतांना शेतात असलेल्या वाजेच्या खांबाच्या तानाला बैलाचा पाय लागला. दरम्यान तानाच्या तारेमध्ये विद्युत प्रवाह आल्याने एका बैलाचा मृत्यू झाला तर शेतकरी आणि दुसरा बैल बालंबाल वाचला आहे. या घटनेने शेतकऱ्याचे लाखाचे नुकसान झाले आहे. यावेळी एमएसीबी चे अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि तलाठी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. सदर शेतकऱ्याला तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## महाविकास आघाडीची गांधीगिरी; अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला घातला फुलांचा हार

### महावितरणने कारभार सुधारावा अन्यथा आंदोलन करणार – राजेसाहेब देशमुख

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

येथील महावितरण कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून महाविकास आघाडीसह शेतकऱ्यांनी गांधीगिरी करीत अनोखे निषेध आंदोलन केले. तालुक्यातील शेतकरी मागील अनेक दिवसांपासून महावितरणच्या ढिसाळ नियोजनाने, दप्तर दिरंगाई, मनमानी कारभारामुळे तसेच जळालेली विद्युत जनित्रे वेळेत न बसविल्याने, उपलब्ध करून न दिल्याने वैतागले आहेत. या कार्यालयातील अधिकारी नेहमीप्रमाणेच आढळून न आल्याने महाविकास आघाडीच्या नेते, पदाधिकारी व शेतकऱ्यांनी मंगळवार, दिनांक २५ जुन रोजी गांधीगिरी करीत कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला फुलांचा हार घालून अनोखे आंदोलन केले. यावेळी बोलताना महावितरणने तात्काळ कारभार सुधारावा, शेतकरी आणि इतर सर्व वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा द्यावी अन्यथा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आंदोलन करणार असल्याचा इशारा बीड जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी दिला. तर महावितरणच्या अनागोंदी कारभाराला जनता वैतागली असल्याचे माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले.

महावितरण कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अनोखे गांधीगिरी आंदोलन का करावे लागले याविषयी अधिक माहिती देताना बीड जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, महावितरण कंपनीच्या कार्यालयात अधिकारी उपलब्ध होत नाहीत, ज्यांच्याकडे वशिला त्याला डिपी मिळतो. गरजू, गोरगरीब शेतकऱ्यांना डिपी सहज मिळत नाही. तसेच नादुरूस्त डिपी आणणे व दुरूस्त झाल्यावर परत पोहोचविणे हे महावितरणचे काम असताना तसे न करता महावितरणचे अधिकारी शेतकऱ्यांनाच हे काम स्वखर्चाने करावयास लावतात. अशा अनेक तक्रारी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आमच्याकडे केल्या आहेत. जनता महावितरणच्या दप्तर दिरंगाई व अधिकाऱ्यांच्या मनमानी



कारभाराला वैतागली आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाची हेळसांड होऊ नये, म्हणून महाविकास आघाडीच्या वतीने आज कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून हे प्रातिनिधिक स्वरूपात आंदोलन केले आहे. परंतु, यापुढे ही जाणिवपूर्वक हालगर्जीपणा करून जनतेला त्रास दिला. तर महावितरण कंपनीच्या कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिला. या बाबत बोलताना माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले की, एकिकडे अंबाजोगाई तालुक्यातील अनेक गावच्या शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेशी वीज उपलब्ध होत नाही. तर दुसरीकडे मात्र जबाबदार अधिकारी हे कार्यालयातच उपस्थित नसतात. यावर्षी शेतातील उभी पिके जळताना बघण्याची वाईट स्थिती उद्भवली. महावितरणच्या भोंगळ व अनागोंदी कारभाराला जनता आता खूप वैतागलेली आहे. कारभार सुधारा, पारदर्शक ठेवा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरेल असे माजी आमदार पृथ्विराज साठे यांनी सांगितले. तालुकाध्यक्ष अमर देशमुख म्हणाले की, विद्युत जनित्र मंजूर असूनही ते वेळेवर बसविले जात नाहीत, ते तातडीने बसवावेत. महावितरणच्या भोंगळ कारभाराला शेतकरी वैतागले आहेत. मंगळवारी आम्ही शेतकऱ्यांसह महावितरणच्या कार्यालयातील कार्यकारी अभियंत्यांच्या कानावर हे गाऱ्हाणे घालण्यासाठी आलो असता, या ठिकाणी कोणीही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांसह आम्ही सुमारे एक ते दीड तास वाट बघून कोणीच आपली दाद-दखल घेत नाहीत. या कारणास्तव गांधीगिरी करीत कार्यकारी अभियंत्याच्या रिकाम्या खुर्चीला फुलांचा हार घालून अनोख्या पद्धतीने आपला निषेध व्यक्त केला आहे. याप्रश्नी लवकरच मोठे आंदोलन केले जाईल. शिवसेनेच्या मदनलाल परदेशी यांनी ही महावितरण कंपनीच्या बोगस कारभाराचा समाचार घेतला. येथील महावितरणच्या कार्यालयातील कार्यकारी अभियंत्यांनी त्यांची कार्यपद्धती बदलावी, उंटावरून कारभार हाकू नये, ग्राहकांच्या तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी. या कार्यालयाचा कारभार रामभरोसे होवू नये अशी अपेक्षा ही परदेशी यांनी व्यक्त केली. यावेळी बीड जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख, माजी आमदार पृथ्विराज साठे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष ईश्वर शिंदे, शिवसेनेचे मदनलाल परदेशी, तारेख अली उस्मानी, तानबा लांडगे, कल्याण भिसे, शेख मुक्तार बागवान, यशोधन लोमटे, हमीद चौधरी, सिध्दू लोमटे, सुधाकर जोगदंड, जुम्मा चौधरी, अमर शिंदे, अमित सोळंके, नाना लोमटे, गणेश शेप, अमन परदेशी, सलिम पिंजारी, राहुल सिरसाट, गणेश घाडगे, रवि मोरे आदींसह महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन महावितरण प्रशासनाचा निषेध केला.

पान ६ वरून...

### नारायणगड संचलित

मागणीनंतर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निधी मंजूर करत रस्त्याचे काम तातडीने करण्याच्या सूचना केल्या. तसेच, वसतिगृहाच्या विविध विकासकामांसाठी आगामी काळात शासन दरबारी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करुन देवू असे आश्वासनही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले. रस्त्याचे भूमिपूजन करताना ज्येष्ठ माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, काकडहिराचे सरपंच अमोल बागलाने, नगरसेवक रविंद्र कदम, अॅड.महेश धांडे, प्रकाश बागलाने, उद्धव बागलाने, विशाल बागलाने, बालाजी जटाळ, धनराज बागलाने, अजय बागलाने, अविनाश मस्के, अभी बागलाने, ईश्वर सुपेकर, नाना बागलाने, महादेव बागलाने, हरिभाऊ बागलाने, रोहन बागलाने आदी उपस्थित होते.

### उपमुख्यमंत्री अजितदादांच्या

आणि पायाची मापे घेतली जाणार आहेत. माप घेतल्यानंतर सुमारे ४० दिवसांमध्ये अवयव वाटप केले जाणार आहेत. यापूर्वीही जुलै २०२२ मध्ये अशाच पध्दतीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सहभागी झालेल्या लाभार्थ्यांनी सुध्दा पुन्हा नोंदणी करून या शिबीरात सहभागी होणे गरजेचे आहे. अत्यंत अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे मजबुत आणि वजनाने हलके अवयव मोफत वाटप केले जाणार आहेत. या शिबीराचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी लवकरात लवकर करण्याचे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### शहरातील स्वच्छता आणि पाणी

वनवन फिरावे लागत आहे. पाणीच नसल्याने नाविलाजाणे कॅनॉल रोड, नारायणा इंग्लिश स्कूल जवळील वॉल वरती नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी रांग लावावी लागत आहे. या सर्व समस्या ऐकून घेतल्यानंतर डॉ. ज्योती मिटे यांनी नगरपालिका अधिकाऱ्यांच्या फोनवरून चर्चा करून या भागातील समस्या सोडवण्यासंदर्भात सूचना केल्या तसेच या समस्यांचे निराकरण न झाल्यास शिवसंग्राम रस्त्यावर उतरेल असेही यावेळी डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या.सांडपाणी नीचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि पाणी प्रश्नाच्या बाबतीत नगरपालिका प्रशासन फेल ठरले आहे याबाबतीत डॉ. ज्योती मेटे आक्रमक झाल्या आहेत.

### पाणंद रस्त्याच्या नावाखाली

आढळतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी मनसेचे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.

मुळात ज्या गावात पाणंद रस्त्यांची कामे करायची आहेत त्या गावातील सरपंच,ग्राम रोजगार सेवक यांची सहमती असणे किंवा त्यांना त्या कामाची माहिती देणे गरजेचे असते मात्र असे न करता तालुक्यात बहुतांशी ठिकाणी कागदोपत्री कामे पूर्ण दाखवत राजकीय पुढाऱ्यांच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून बिले मंजूर करून घेतल्याने शासनाचा चांगल्या कामाला आलेला निधी कार्यकर्त्यांनी आपल्या खिशात भरण्याचे काम जोरात केले असल्याची चर्चा आष्टी तालुक्यात आहे.त्यातच ज्या ठिकाणी काही प्रमाणात कामे झाली आहेत त्याठिकाणी शेतकऱ्यांची संमती पत्र दानपत्र दिलेली नसताना शासनाच्या नियमानुसार सर्व रस्त्यांची कामे केलेली नाहीत तसेच कामाच्या वेळी जिओ टॅगिंग केलेले आढळून येत नाही किंवा व्हिडिओ शूटिंग केलेली नाही तालुक्यात कुठल्याच कामावर मजुराचा वापर करण्यात आलेला नाही शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवत काम करण्याचा बोगस बिलो उचलण्याचा सपाटात चालू आहे तालुक्यातील सर्व कामांची विभागीय चौकशी होणार खूप गरजेचे आहे नाहीतर शासनाच्या महत्त्वकांशी योजनेचा बट्ट्याबोळ करून खूप मोठा आर्थिक घोटाळा झालेला आहे काही ठिकाणच्या आनंद रस्त्याच्या कामामध्ये किती मीटर रस्ता आहे किती मीटर केला गेला हे सुद्धा चौकशी गरजेचा आहे ज्या ठिकाणी रस्ते झाले त्या ठिकाणी अंदाजपत्रकाप्रमाणे रस्त्या न करता फक्त मुरमाचा थर देऊन रस्ते दाखवून शासनाच्या निधीवर डल्ला मारण्याच्या उद्देशाने कामे होत आहेत आष्टी तालुक्यातील सर्व रस्त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले.




# पुन्हा कांद्याला आलं मार्केट

## कुठ ३००० तर कुठं ४००० रुपयांचा दर, शेतकऱ्यांना मोठा दिलासा

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. सध्या कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, २५ जून रोजी राज्यातील ४४ बाजार समित्यांमध्ये कांद्याचा लिलाव झाला. यापैकी ३४ मध्ये ३००० ते ४२०० रुपये प्रतिक्विंटल भाव होता. कोणत्याही बाजारात भाव २५०० रुपये प्रति क्विंटलपेक्षा कमी नव्हता. दरम्यान, आवक कमी असल्यामुळं कांद्याच्या दरात वाढ होत आहे. महाराष्ट्रात कांद्याचे दर रोज नवनवे विक्रम करत आहेत. राज्यात कांद्याचे भाव ४२०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. २५ जून रोजी नागपूरच्या रामटेक मंडईत केवळ कांद्याला विक्रमी किमान ४ हजार रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. तर कमाल दर हा ४२०० रुपये तर सरासरी ४१०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. या बाजारात कांद्याची आवकही कमी झाली होती.

मोठ्या बाजार समित्यांमध्ये कांद्याची आवक कमी

केंद्र सरकारने ७ डिसेंबर २०२३ पासून लागू केलेली निर्यातबंदी ४ मे रोजी उठवण्यात आली होती. यानंतर कांद्याची निर्यात होऊ लागली. देशांतर्गत बाजारपेठेतील आवक कमी होऊ लागली. आवक कमी झाल्याने भाव वाढले.



यापूर्वीच महाराष्ट्रात यंदा कमी उत्पादनाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे दरात वाढ होत आहे. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव-बसवंतमध्ये १८००० क्विंटल, लासलगाव-विंचूरमध्ये १२५००, लासलगावमध्ये ११३२८ आणि सोलापुरात ११७९३ क्विंटल कांद्याची आवक झाली होती.

कोणत्या बाजारात किती दर? : पुणे बाजारात कांद्याला किमान भाव १२०० रुपये, तर कमाल भाव ३००० रुपये आहे. अकोला बाजारात किमान भाव २००० रुपये तर कमाल दर ३४०० रुपये आहे. पिंपळगाव बाजारात कांद्याचा किमान भाव २७०० रुपये तर कमाल दर १७०० राहुरी बाजारात कांद्याचा किमान भाव २३०१ रुपये, कमाल भाव २३२६ रुपये आणि उच्च प्रतीचा कांदा ४३१३ रुपये प्रति क्विंटलने विकला जातोय.

सध्या शेतकऱ्यांकडे कमी कांदा शिल्लक : सध्या कांद्याच्या दरात वाढ होत असतानाचे चित्र दिसत असले तरी शेतकऱ्यांकडे मात्र कांदा शिल्लक नाही. त्यामुळं मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होणार नाही. मात्र, सध्या ज्या शेतकऱ्यांकडे कांदा शिल्लक आहे, त्या शेतकऱ्यांना चांगला फायदा होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, ज्यावेळेस शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात कांदा शिल्लक होता, त्यावेळेस सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. त्यामुळं कांद्याचे दर खूप कमी आले होते. याचा शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. ज्यावेळी शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात कांदा शिल्लक नाही, त्यावेळी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : लंडनमध्ये पहिले महिला मासिक द लेडीज मर्क्युरी प्रकाशित केले गेले.
१९५० : अमेरिकेने कोरियन युद्धात आपले सैन्य पाठवण्याचा निर्णय घेतला.
१९५४ : अणुशक्तीवर चालणारे जगातील पहिले विद्युतकेंद्र (क्षमता: ५००० किलो वॅट) रशियातील मॉस्कोजवळ ओबनिन्स्क येथे सुरू झाले.
१९६४ : साली दिल्ली येथील तीन मूर्तिच्या भवनामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे संग्रहालय बनवण्याचा निर्णय घेण्यात आला.
१९६७ : लंडनजवळ एन्फिल्ड येथे जगातील पहिले ए.टी.एम. सुरू.
१९७७ : जिबुटी ला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९९१ : युगोस्लाव्हियाने स्लोव्हेनियावर आक्रमण केले.
१९९६ : अर्थतज्ज्ञ द. रा. पेंडसे यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चा 'चिंतामणराव देशमुख पुरस्कार' जाहीर
१९८१ : कंबोडियाने संविधान स्वीकारले.
२००२ : परमाणु शस्त्र नष्ट करण्याच्या रशियाच्या योजनेस जी-८ देशांनी आपली सहमती दर्शविली.
२००८ : साली मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष बिल गेट्स यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२०१५ : साली संयुक्त राष्ट्र संघाने भारतीय चित्रपटाच्या इतिहासात विशेष स्थान असणार्या सत्यजित रे यांचे चित्र प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६२ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ जानेवारी १५१५)
१५५० : चार्ल्स (नववा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ३० मे १५७४)
१८३८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत 'वंदे मातरम' हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (मृत्यू: ८ एप्रिल १८९४)
१८६४ : शिवराम महादेव परांजपे 'काळ' कर्ते, विद्वान, वक्ते, लेखक, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार (मृत्यू: २७ सप्टेंबर १९२९)
१८६९ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन प्राणीशास्त्रज्ञ हॅन्स स्पेमन यांचा जन्म.
१८७५ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (मृत्यू: १३ मार्च १८९९)
१८८० : हेलन केलर अंध व मूकबधीर असुनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती, समाजसेविका, राजकीय कार्यकर्त्या व शिक्षिका (मृत्यू: १ जून १९६८)
१८९९ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज चे स्थापक जुआन पेप्पे यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८१)
१९१७ : खंडेराव मोरेश्वर ऊर्फ 'खंडू' रांगणेकर आक्रमक डावखुरे फलंदाज (मृत्यू: ११ आक्टोबर १९८४)
१९२२ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय तामिळ भाषिक लेखक, कादंबरीकार, लघुकथा लेखक, पत्रकार, व्यंगचित्रकार, प्रवासी लेखक, नाटककार आणि पटकथा लेखक अकिलन यांचा जन्मदिन.
१९३९ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' संगीतकार (मृत्यू: ४ जानेवारी १९९४)
१९६२ : भारतीय-कॅनडातील उद्योगपती सुनंदा पुष्कर यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४)
१९६४: साली पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट सेवानिवृत्त भारतीय धावपटू पी. टी. उषा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०८ : धनाजी जाधव मराठा साम्राज्यातील सेनापती (जन्म: १६५०)
१८३९ : महाराजा रणजितसिंग शिख साम्राज्याचे संस्थापक (जन्म: १३ नोव्हेंबर १७८०)
१९५७ : हर्मन बुहल फ्रिट्झ विंटरस्टेलर, मार्कस श्मक, कर्ट डिमबर्गर यांच्या सोबत ब्रॉड शिखर पहिल्यांदा चढणारे ऑस्टीयन गिर्यारोहक (जन्म: २१ सप्टेंबर १९२४)
१९९६ : अल्बर्ट आर. ब्रोकोली 'जेम्स बाँड' पटांचे निर्माते (जन्म: ५ एप्रिल १९०९)
१९९८ : होमी जे. एच. तल्यारखान गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (जन्म: ९ फेब्रुवारी १९१७)
२००० : द. न. गोखले शिक्षणतज्ज्ञ व चरित्रकार (जन्म: )
२००२ : भारतीय उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचे निधन.
२००८ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (जन्म: ३ एप्रिल १९१४)

# सततची आंदोलने, पाठपुराव्यामुळे मिळणार पीकविमा




बुलढाणा : बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले त्याची भरपाई भरून काढण्यासाठी पीकविमा मिळावा या उद्देशाने केलेली आंदोलने आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. गत वर्षीच्या खरीप व रब्बी हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीचा मोबदला आणि पीकविमा लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे, अशी माहिती रविकांत तुपकर यांनी दिली.

बुलडाणा जिल्ह्यात गेल्या खरीप व रब्बी हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीपिकांचे नुकसान झाले होते. या झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई व पीकविमा शेतकऱ्यांना मिळावा म्हणून तुपकरांनी सातत्याने आंदोलने केली. चिखली तालुक्यातील सोमठाणा येथे केलेले अन्नत्याग आंदोलन व त्यानंतर मुंबई येथील मंत्रालय ताबा आंदोलन व त्यावेळी मुंबईत सह्याद्री अतिथिगृहावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पीकविमा व नुकसान भरपाई देण्याची मागणी मान्य झाली होती. परंतु रक्कम न मिळाल्याने शेतकऱ्यांसह तुपकरांनी पुन्हा एकदा नागपूर अधिवेशनावर धडक दिली होती. त्यावेळी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पीकविमा व नुकसान भरपाई देण्याचे त्यांनी मान्य केले होते. त्यानंतर पीकविम्याची काही रक्कम शेतकऱ्यांना मिळाली पण अजूनही हजारो शेतकरी पिकविम्यापासून वंचित आहेत.

पुन्हा तुपकरांनी १२ जून रोजी कृषिमंत्री मुंडे यांची भेट घेऊन पीकविम्याची मागणी लावून धरली. प्रधान सचिव (कृषी) यांच्याकडेही पाठपुरावा केला. त्यानंतर कृषिमंत्र्यांनी पीकविमा कंपनीला आदेश दिले आहेत. आता लवकरच पीकविमा जमा करण्याचे कंपनीने मान्य केल्याने आंदोलन व पाठपुराव्याला यश आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# शेतीशी निगडित शंका समस्या करा टोल फ्री डायल

खरीप हंगाम सुरू झालेला आहे आणि शेतकरी तयारीला लागलेला आहे. परंतु शेतीशी निगडीत अनेक प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असतात. महाराष्ट्र शासन, कृषी विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेतीशी निगडित शंका व समस्यांचे समर्पक निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी टोल फ्री कक्ष सुरू करण्यात आलेला आहे. हा कक्ष कार्यालयीन कामाच्या दिवशी सुद्धा सुरू आहे. टोल फ्री कक्षामध्ये संपर्कासाठी १८०० २३३ ४००० हा लॅन्डलाईन व ९८२२४४६६५५ हा मोबाईल व्हाट्स अप क्रमांक शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला आहे. खालीलप्रमाणे शंकांचे निरसन करण्यासाठी शेतकरी बांधव कृषी विभागाशी संपर्क करू शकतात. खते बियाणे कीटकनाशके यांची खरीप रब्बी हंगामातील





किंमत उपलब्धता गुणवत्ता बाबत शंका निरसन करण्यासाठी कृषी विभागाचे निगडित मृदा संधारण विस्तार सांख्यिकी प्रक्रिया व नियोजन, फलोत्पादन, निविष्ठा व गुणनियंत्रण, कृषी यंत्रीकिकरण इत्यादी संबंधित शंकांचे निरसन करण्यासाठी. संबंधित जिल्ह्यांचे कृषी विभागाचे संपर्क क्रमांक, कृषी विद्यापीठांचे संपर्क क्रमांक आवश्यकता असल्यास दिले जातात.

केवळ संदेश पाठवण्यासाठी टोल फ्री क्रमांक ९८२२४४६६५५ यावर संपर्क केला जाऊ शकतो. खरीप हंगाम व रब्बी हंगामात कृषी निविष्ठाची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिंकिंगबाबतच्या तक्रारी नोंदवताना शेतकऱ्यांनी आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, अडचणी किंवा तक्रारीचा संक्षिप्त तपशील व्हाट्सअप वर पाठवण्यासाठी उपलब्ध आहे. शेतकरी बांधवांनी सदर टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून व मार्गदर्शन घेऊन आपल्या शंकांचे निरसन करावे असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. सदर टोल फ्री क्रमांक कार्यालयीन कामाच्या दिवशी सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० वाजेपर्यंत सुरू राहील.

# पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी बांबू लागवडीस प्राधान्य द्यावे

पुणे : जागतिक तापमानवाढीमुळे हवामान बदलाचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी बांबू लागवडीस प्राधान्य द्यावे आणि मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड करावी, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे यांनी केले. मनरेगा अंतर्गत बांबू व फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी विधान भवन येथे पुणे विभागातील विविध विभागांचे अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थाच्या पदाधिकारी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, मनरेगा महासंचालक नंदकुमार, मनरेगा आयुक्त अजय गुल्हाणे, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, कुमार आशिर्वाद, राजा दयानिधी, जितेंद्र डूडी, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, रोजगार हमी योजना उपायुक्त वैशाली इंदाणी ऊंटवाल, विभागीय कृषी सहसंचालक रफीक नाईकवाडी, बी.जी.बिराजदार आदी उपस्थित होते.

श्री.दराडे म्हणाले की, बांबू ही दीर्घकालीन आणि सदाहरित वनस्पती असून लागवडीचा खर्च कमी असल्याने शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. सध्या मागणीच्या तुलनेत बांबूचा पुरवठा कमी आहे. पर्यावरणपूरक विविध आकर्षक वस्तू आणि फर्निचर



निर्मितीसाठी बांबूची वाढती मागणी लक्षात घेता दरवर्षी सुमारे एक लाख बांबू लागवड करण्याचे नियोजन आहे. बांबूची लागवड, त्यावरील प्रक्रिया आणि विक्री सुलभतेने होण्यासाठी तालुकास्तरावर बांबू डेपो स्थापन करण्यात येणार आहेत. त्यासाठी समन्वय अधिकारी नेमण्यात येणार आहे. बांबू लागवडीसाठी शासनाच्यावतीने प्रतीहेक्टर सात लाख रुपये अनुदान देण्यात येत असल्याची माहिती श्री.दराडे यांनी दिली. कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी चंद्रपूर येथील बांबू प्रशिक्षण केंद्र आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात बांबूपासून निर्मिती केलेल्या वस्तू, पर्यटन केंद्राच्या ठिकाणची निवासव्यवस्था आणि तेथील बांबूचा वापर पाहण्यासाठी आवर्जून भेट द्यावी अशी सूचनाही त्यांनी केली.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, विभागातील उघडे बोडके डोंगर तसेच गायरान आणि मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड करावी आणि पुढील पाच वर्षे त्याची निगराणी करावी. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गाळ साचण्याचे प्रमाण कमी होण्यासाठी आणि जमीनीची धूप टाळण्यासाठी मिशन मोडवर बांबू लागवड करण्याची तसेच त्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, सिंचन विभाग आणि वन विभाग अधिकारी यांच्या समन्वयाने बांबू लागवड आणि संवर्धनाचे काम करावे असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दीर्घ काळापर्यंत बांबूचे निश्चित उत्पादन घेता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असे मनरेगा महासंचालक श्री.नंदकुमार यांनी सांगितले. भारतात बांबू उत्पादन आणि त्यावरील प्रक्रिया उद्योगास मोठी संधी असून शाश्वत भविष्यासाठी बांबू उत्पादनात वाढ करण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. बांबू उत्पादन आणि प्रक्रिया, फर्निचर निर्मिती, घरांची निर्मिती आणि उत्पादन वाढीसाठी नियोजित योजना तसेच बांबूचा वापर करुन बांधण्यात आलेले बंगळूरू येथील विमानतळ, सिंधुदुर्ग व चंद्रपूर येथील बांबू निर्मित वस्तू यासंबधी सादरीकरणाद्वारे त्यांनी माहिती दिली. कार्यशाळेत विभागातील वन विभाग, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

# निर्यातीमुळे गहू, सरकी ढेपच्या भावात वाढ

## हरभरा अन् सोयाबीनच्या दरात मात्र चढ-उतार!

पुणे : खरीप हंगामामुळे शेतकरी बाजारपेठेत बियाणे व खत खरेदीसाठी दुकानांवर गर्दी करत आहेत. गहू, बाजरी, सोयाबीन, मका, सरकी ढेप या वस्तुमालांचे दर तेजीत असून ज्वारी, तूर, हरभरा, सोने चांदीचे दर घसरले आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींमुळे गेल्या काही दिवसांपासून देशातील गहू दरात मोठी वाढ पाहायला मिळत आहे. प्रामुख्याने चीन, भारत, ऑस्ट्रेलिया, रशिया आणि युक्रेन हे देश जागतिक गहू उत्पादनात आघाडीवरील देश आहेत. मात्र, प्रमुख गहू निर्यातदार देश असलेल्या रशिया आणि युक्रेनमध्ये यावर्षी गहू उत्पादनात मोठी घट नोंदविली गेली आहे. ज्याचा थेट परिणाम जागतिक गहू उत्पादनावर झाला असून, कमी उत्पादना अभावी दरात तेजी पाहायला मिळत आहे. परिणाम स्वरूप, भारतात देखील काही काळापासून गहू दरात तेजी पाहायला मिळत आहे.

जालना बाजारपेठेत गव्हाचे दर २४०० ते ४००० रुपये प्रति क्विंटल असे आहेत. देशातील बाजारात सोयाबीनच्या भावात काहीसे चढ-उतार दिसून आले. काही ठिकाणी बाजारात ५० रूपयांपर्यंतची तेजी आली होती, तर अनेक ठिकाणी बाजार स्थिर होता. सोयाबीनचे दर सरासरी ४ हजार १०० ते ४ हजार ५०० रूपयांच्या दरम्यान आहेत. मागील बऱ्याच दिवसांपासून सरकी ढेपचे भाव घसरलेले होते. मात्र, सरत्या आठवड्यामध्ये त्यात १०० ते १५० रूपयांची तेजी बघायला मिळाली. सरकी ढेपचे सध्याचे दर ३१०० ते ३३०० रुपये प्रति क्विंटल आहे. कापसाच्या दरातही ३०० ते ५०० रूपयांची वाढ झाली. कापसाचे दर ७००० ते ७६०० रुपये प्रति क्विंटल असे आहेत. ज्वारीचे भावमागील दोन महिन्यांपासून नरमलेले आहेत. रब्बी हंगामात ज्वारीचे उत्पादन चांगले आल्याचे व्यापारी सांगत आहेत, तर दुसरीकडे शेतकरी उत्पादन कमी राहिल्याचे कळवत आहेत, पण बाजारातील आवक वाढल्यानंतर ज्वारीतील तेजी कमी झाली.

ज्वारीला मागील काही आठवड्यांपासून २ हजार ३०० ते ३ हजार ५०० चा भाव मिळत आहे. हा भाव व्हरायटीप्रमाणे आणि गुणवत्तेप्रमाणे मिळत आहे. ज्वारीचे सध्याचे भाव आणखी काही दिवस असेच स्थिर राहू शकतात. त्यानंतर ज्वारीच्या दरामध्ये मोठी तेजी येण्याचा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे.



## थोडक्यात



### केएसपी विद्यालयामध्ये शाहू महाराज जयंती साजरी

बीड : दि.२६/०६/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी. विद्यालयामध्ये छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थाध्यक्ष सौ. अंजलीताई शेळके, समग्र शिक्षण विभाग प्रमुख तथा शाळेचे मार्गदर्शक ऋषिकेश शेळके साहेब, प्र.मुख्याध्यापक विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत प्रतिमापुजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये मनोगत व्यक्त करतांना मान्यवरांनी शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. यावेळी कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### प्रा. अशोक नागरगोजे यांना पीएच. डी. प्रदान

पाटोदा – येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान



महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागात कार्यरत प्रा. अशोक नरहरी नागरगोजे यांना नुकतीच राजस्थान स्थित श्री जगदिशप्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठाने रसायनशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.प्रा. नागरगोजे हे गत १९ वर्षांपासून सेवेत कार्यरत आहेत. त्यांनी आपला 'पोटेन्शीओमेट्रिक स्टडी ऑफ कॉम्प्लेक्सेस ऑफ बीटाडायकिटोन विथ सम ट्रान्झिशन मेटल आयन्स' या विषयावरील शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉ. राकेश कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. नागरगोजे यांच्या या उपलब्धिबद्दल संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर, डॉ. देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. पीएच. डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल प्रा. अशोक नागरगोजे यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, लिपिक कृष्णा शेवंते उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. किशोर मचाले, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कार्यालय अधीक्षक अशोक पवार, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत यांच्यासह विभागाचे विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रा. नागरगोजे यांचे अभिनंदन केले.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात शाहू महाराजांना अभिवादन

पाटोदा : येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ जून रोजी छत्रपती राजर्षि शाहू




महाराज यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दिलीप गिन्हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. शरद पवार यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा व शैक्षणिक कार्याविषयी विस्तृतपणे विश्लेषण केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे म्हणाले की, शाहू महाराजांनी जातीयता निर्मूलनासाठी फार मोठे पाऊल उचलले तसेच प्राथमिक शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. शिष्यवृत्ती संकल्पनेचे ते जनक होते. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे अमूल्य असे योगदान आहे. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिन्हे यांनी केले. कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, प्रोफेसर महादेव काळे, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत, डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. सूर्यकांत देशमुख, डॉ. अशोक नागरगोजे, डॉ. काकासाहेब पोकळे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. संजय बोंडगे यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

# बीड बायपासला स्लिप सर्व्हिस रोड व उड्डाणपुल करून देणार

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे औरंगाबाद खंडपीठात शपथपत्र आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश

बीड । प्रतिनिधी

बीडमधून जाणारा औरंगाबाद–येडशी राष्ट्रीय महामार्ग नऊ वर्षांपुर्वीच पुर्ण झाला आहे. या महामार्गावर बीड शहराच्या बाजुने १२ कि.मी. चा बायपास गेला आहे. परंतु शहरात प्रवेश होणार्या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आवश्यक असताना या ठिकाणांवर उड्डाणपूल नाही. तसेच परळी रोड, नाथापुर रोड, इमामपुर रोड या ठिकाणी स्लिप सर्विस रोडही करण्यात आलेले नाही. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी वारंवार अधिवेशनात, शासनस्तरावर याबाबत पाठपुरावा केला होता, तरीही यावर उपाय न झाल्याने शेवटी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यावर आता खंडपीठाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून येणार्या वार्षिक अर्थसंकल्पात उड्डाणपूल आणि आवश्यक ठिकाणी स्लिप सर्विस रोड करणार असे शपथपत्र घेतले आहे.

औरंगाबाद–येडशी राष्ट्रीय महामार्ग मागच्या नऊ वर्षांपुर्वीच पूर्ण झालेला आहे. बीड शहराच्या बाजुने एकूण १२ कि.मी. चा बायपास गेला आहे. बीड शहरात येण्यासाठी दोन्ही बाजूंनी चौक आहेत. इंडियन रोड कॉंग्रेस च्या मार्गदर्शक तत्वांनुसार सध्याच्या छत्रपती संभाजी महाराज चौक बार्शी रोड आणि महालक्ष्मी चौक जालना रोड या दोन्ही ठिकाणांवर उड्डाणपूल आवश्यक आहे. तसेच परळी रोड, नाथापूर रोड राज्यमार्ग या ठिकाणी ११ सप्टेंबर २०१८ रोजी स्लिप सर्व्हिस रोड मंजुर आहे. परंतु अद्यापपर्यंत याचे काम सुरू झालेले नाही. तसेच इमामपुर रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग क्र.७४ असून या ठिकाणीही स्लिप सर्व्हिस रोडची आवश्यकता आहे. तरीही याठिकाणचा स्लिप सर्व्हिस रोड मंजुर करण्यात आला नाही. आ.संदीप क्षीरसागर यांनी या बाबत राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून इमामपुरला स्लिप सर्व्हिस रोड मंजुर करून या भागातील शेतकर्यांच्या दळणवळणाची सोय करावी अशी मागणी दि.४ डिसेंबर २०१९ रोजी पत्राद्वारे केली होती. यावर मंत्री नितीन गडकरी यांनी संबंधित विभागाला इमामपुर रोड या ठिकाणी स्लिप सर्व्हिस रोड मंजुर करावा अशी सूचना दिली होती. परंतु तरीही इमामपुर रोडला स्लिप सर्व्हिस रोड दिला गेला नाही. तसेच बीड आणि गेवराई उड्डाणपुलाचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक औरंगाबाद यांनी राष्ट्रीय महामार्ग नागपूर प्रादेशिक कार्यालयाकडे पाठवला होता. हा प्रस्ताव नागपुर प्रादेशिक कार्यालयाने मंत्रालयाकडे पाठवला होता. परंतु राष्ट्रीय महामार्ग कार्यालय दिल्ली यांनी गेवराई उड्डाणपूलाचा प्रस्ताव मंजूर केला पण बीडचा प्रस्ताव प्रलंबित ठेवला. बीड शहरासाठी आवश्यक असलेले स्लिप सर्व्हिस रोड आणि उड्डाणपुल वारंवार पाठपुरावा करून देखिल मंजुर होत नसल्याने शेवटी आ.संदीप क्षीरसागर यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. सदरील याचिका क्रमांक ११७६ ऑफ २०२४ च्या दि.३० जानेवारी २०२४ रोजीच्या सुनावणीत औरंगाबाद खंडपीठाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दि.२३ फेब्रुवारी २०२४ पर्यंत शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे औरंगाबाद प्रकल्प संचालक श्री.रविंद्र इंगोले यांनी दि.८ मे २०२४ रोजी न्यायालयात शपथपत्र दाखल करून आम्ही येणार्या आर्थिक वर्षात या कामांना मंजुरी घेऊन काम पूर्ण करु असे सांगितले. सदरील याचिकेवर दि.२८ जून २०२४ रोजी अंतिम आदेश होणार आहे. दरम्यान या विषयात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



### दोन वर्षांत १७ लोक मृत्युमुखी

बीड शहराचे प्रवेशद्वार असलेल्या, छत्रपती संभाजी महाराज चौक आणि महालक्ष्मी चौक याठिकाणी केवळ उड्डाणपूल नसल्याने गेल्या दोन वर्षांत तब्बल १७ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे तर असंख्य लोक याठिकाणी अपघात होऊन जखमी झाले आहेत.

### राजकारणातून लोकांचा जीव धोक्यात!

गेवराई आणि बीड या दोन्ही शहरांसाठी उड्डाणपूल प्रस्तावित असताना गेवराईचा उड्डाणपूल मंजूर होतो पण बीडचा नाही! अशी परिस्थिती राजकीय मतभेदातून झाली आहे. गेवराई चे आमदार भाजपा चे आहेत आणि बीडचे आमदार विरोधी पक्षाचे आहेत हेच यामागचे बहुतेक कारण असावे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात ऑलिम्पिक क्रीडा दिन

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रीडा विभागामार्फत सोमवारी जागतिक ऑलिम्पिक क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, उपप्राचार्य तथा विभागप्रमुख डॉ. किशोर मचाले, डॉ. विनोद पवार, प्रोफेसर महादेव काळे उपस्थित होते.



ऑलिम्पिक क्रीडा दिनाचे महत्व विषद करताना डॉ. तानाजी आगळे आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की ग्रीसमधील प्राचीन ऑलिम्पिक खेळांचा इतिहास ३००० वर्षांचा आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक खेळांची सुरुवात प्रथम १८९६ मध्ये अथेन्स येथे झाली. ग्रीस, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, भारत यांच्यासह १४ देशांचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. भारताचे प्रतिनिधित्व करणारे महाराष्ट्राचे कुस्तीपटू खाशाबा जाधव हे एकमेव भारतीय खेळाडू कुस्ती खेळाचे ऑलिम्पिक पदक विजेते होते. तर हॉकी या सांघिक खेळात मेजर ध्यानचंद यांच्या संघाने भारताला दुसरे ऑलिम्पिक पदक मिळवून दिले. भारतासाठी पहिले ऑलिम्पिक सुवर्ण पदक अभिनव बिंद्रा यांनी १० मि. एअर रायफल शूटिंग मध्ये पटकावले अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे म्हणाले की, महाविद्यालयाच्या भव्य क्रीडा संकुलातून उच्च दर्जाचे खेळाडू घडावेत व त्यांच्या माध्यमातून देशाचा नावलौकिक वाढावा यासाठी क्रीडा विभागाने अथक परिश्रम घ्यावेत. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. विनोद पवार यांनी केले.

# बीड शहरामध्ये रस्त्याच्या प्रश्नावर करण लोंढे यांचे सरण रचून आंदोलन



बीड । प्रतिनिधी

राज ठाकरे यांच्या आदेशानुसार व मनसेचे दिलीप धोत्रे ,मनसे सरचिटणीस तथा शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या सूचनेवरून आज दिनांक २६ /६/२०२४ वार बुधवार रोजी बीड शहरातील अमरधाम स्मशानभूमी समोरील पुलावर मनसे शहर अध्यक्ष करण लोंढे यांनी केलेले सरण रचो आंदोलन लक्षवेधी ठरले आहे. हे अनोखे आंदोलन केल्यामुळे शहरांमधील नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे.

शहरांमधील अमरधाम स्मशानभूमी ते श्री संत सावता माळी चौक जिजामाता चौक फुलाई नगर जालना रोडला व जुना मोंढा मार्केट कमिटी ला जोडणारा मुख्य रस्ता असून हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून शहराध्यक्ष करण लोंढे हे वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करत आहेत. परंतु प्रशासन मात्र त्यांच्या आंदोलन गांभीर्याने घेत नसल्याचे दिसत आहे. रस्त्यामध्ये ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्याला जोडणार्या पुलावर तर संपूर्ण लोखंडाचे साखळे (गज) वर आले आहे. वाहन चालकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून त्या रस्त्यावर अनेक अपघात झाल्याच्या घटना समोर येत आहेत. प्रशासन मोठा अपघात होण्याची वाट पाहत आहे का असा प्रश्न सध्या नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घ्यावा अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसे शहर अध्यक्ष करण लोंढे यांनी दिला आहे. यावेळी जिल्हा सचिव सोमेश कदम, उपाध्यक्ष कुणाल उगले, महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे, हिराताई कांबळे,ओम पालवे, प्रतीक लोळगे , अंकित भस्मे, किरण पतंगे, गजू भाऊ गाडे, ऋषिकेश आडगळे, ओमकार चांदणे, राज थोरात, सम्राट लोंढे, आदित्य मुजमुले, ऋषिकेश सोळुंके, सिताराम दिघे, गणेश शर्मा यांची उपस्थिती होती.

# नगरपालिकेकडील वीज थकबाकी भरून पाणीपुरवठा सुरळीत करा–आ.संदीप क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

पाण्याचा स्त्रोत आणि अमृत पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा सज्ज असूनही केवळ या योजनेस, नगरपालिकेकडे महावितरण विभागाची ३६ कोटी रुपये थकबाकी असल्याने वीज कनेक्शन मिळत नाही. आणि त्यामुळे बीड शहराला १५ दिवसाला पाणी येत आहे. या विषयात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी कोर्टात धाव घेतली आणि आता मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वीजेची थकबाकी भरून योजनेस वीजजोडणी करून बीड शहरात पाणीपुरवठा सुरळीत करा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी केली आहे.

सध्या बीड शहराची लोकसंख्या अंदाजे ३ लाख आहे. बीड शहराला सध्या माजलगाव धरणातून पाणीपुरवठा होत आहे. त्याची क्षमता २४ एमएलटी आहे. यासोबतच बिंदुसरा धरणातून ६ एमएलटी पुरवठा होत आहे. सध्या बिंदुसरा धरणाची पाणीपातळी कमी झाली आहे. त्यामुळे बीड शहराला माजलगाव बॅकवॉटर मधून पाणीपुरवठा होत आहे. बीड शहराच्या पाण्याची गरज लक्षात घेत दि.२९ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार अमृत पाणीपुरवठा योजना सुरू केली असून तीची क्षमता २५ एमएलटी इतकी आहे. या योजनेचे काम ९५ टक्के पूर्ण आहे आणि उर्वरित ५ टक्के कामही सुरू आहे. परंतु नगरपरिषदेकडे महावितरणचे ३६ कोटी रूपये वीजबिल थकबाकी आहे. त्यामुळे या योजनेला नवीन कनेक्शन मिळत नाही. सदरील योजनेचे सर्व काम आणि यंत्रणा तयार असूनही केवळ वीज कनेक्शन अभावी बीड शहराला १५ दिवसाला पाणी मिळत आहे. यबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी वारंवार अधिवेशनात, शासनस्तरावर पाठपुरावा केला अनेक प्रयत्न केले परंतु यावर काहीच उपाय न झाल्याने शेवटी, आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली.

# सरस्वती विद्यामंदिर शाळेत राजर्षी शाहू महाराज जयंती

बीड । प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोड , शिवाजीनगर येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेत थोर समाजसुधारक लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना इयत्ता दहावीतील विद्यार्थी क्षितिज उघाडे म्हणाला की , आज खऱ्या अर्थाने भारताला राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची गरज आहे . महाराजांचे शैक्षणिक , आर्थिक व सामाजिक विचार अंमलात आणले तर भारत हा जगातील सर्वात संपन्न देश बनेल आणि अल्पावधीतच महासत्ता होईल.

आपल्या संस्थानातील जनता सुखी व समृद्ध करावयची असेल तर सर्वांना शिक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही , हे शाहू महाराजांनी जाणले म्हणूनच त्यांनी अनेक शाळा स्थापना केल्या तसेच शाळा स्थापन करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देऊन अनुदान दिले. गरीब , श्रीमंत सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची जेवणाची व राहण्याची गैरसोय होऊ नये यासाठी शाहू महाराजांनी वसतिगृह निर्माण केले. म्हणूनच त्यांना वसतिगृहाचे जनक असे म्हटले जाते. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी महाराजांनी नोकरीमध्ये दलित वर्गासाठी ५० टक्के आरक्षण लागू केले. मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढावा म्हणून महाराजांनी संस्थानाच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस क्लार्क यांची नेमणूक केली. सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला , कुलकर्णी वतने रद्द करून पगारी तलाठ्याची नेमणूक करण्यास सुरुवात केली. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षकांची परीक्षा घेऊन नेमणूक करण्यास सुरुवात केली . असेही क्षितिज उघाडे म्हणाला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना इयत्ता नववीतील विद्यार्थिनी स्नेहल डोळसे म्हणाली की, संस्थानातील शेतकऱ्यांचा विकास घडवून आणण्यासाठी शेतीला पाणीपुरवठा व्हावा याकरिता महाराजांनी राधानगरी हे धरण बांधले , कृषी मेळावे आयोजित करुन नवीन बिबियानांची व जास्त दूध देणाऱ्या गाई म्हशींची माहिती शेतकऱ्यांना दिली . शेतकऱ्यांना सावकाराच्या जाचातून मुक्त करण्यासाठी संस्थानातून कर्ज दिले . यावेळी आरती शेळके , मयुरी गुरव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक ज्ञानेश्वर ढोरमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीराम घोडके यांनी केले.

## राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराजांची जयंती

बीड । प्रतिनिधी

आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय येथे सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य चौधरी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहशिक्षक पाटील हे होते.

छत्रपती शाहू महाराज यांचे जीवन व कार्य यावर शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे केली यानंतर प्रमुख पाहुणे पाटील यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्याबद्दल माहिती दिली . छत्रपती शाहू महाराजांनी सर्व समाज शिक्षित होण्याच्या दृष्टीने 'शिक्षणाला' महत्त्व देऊन सर्व मुला–मुलीं पर्यंत शिक्षणाची गंगा दारोदार पोहोचण्याचा दृष्टीने प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे कोल्हापूर हे प्रथम संस्थान ठरले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की ब्रिटिश सत्तेच्या काळापासून सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी ज्या छत्रपती शाहू महाराजांनी कार्य केले त्यांच्या जयंती निमित्त सर्व देशभर २६ जून हा दिवस ' सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो.

# डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर वै.महंत रामदास बाबा पायी दिंडीचे प्रस्थान ५ जुलै रोजी होणार

वडवणी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवण येथील रामदास बाबा पायी दिंडी सोहळा सोहळ्याचे प्रस्थान ५ जुलै २०२४ वार शुक्रवार रोजी होणार आहे. या पायी दिंडीचे आयोजन ह.भ.प.वै.महंत रामदास बाबा सद्गुरू भगवान बाबा,वामन भाऊ,भिमसिंह बाबा, काशीगिरी बाबा,यांच्या कृपाशीर्वादाने गेल्या अनेक वर्षापासून होत आहे.तरी समस्त भाविकांनी व संस्थान च्या भक्त परिवारातील भाविकांनी डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे अशी ह.भ.प.महंत पांडुरंग महाराज शास्त्री गुरु रामदास बाबा यांच्या कडून सर्व भक्त परिवाराला विनंती. आषाढी वारी म्हणलं की, वारकऱ्यांना वेगळीच उत्सुकता लागलेली असते.या वारीचा आनंद घेण्यासाठी आणि पांडुरंगाचा आशीर्वाद घेण्यासाठी भक्त वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात .खरंच हा दिंडी सोहळ्यातील आनंद खूपच वेगळा असतो .काही दिवसांपूर्वीच शेतकरी राज्याचे शेतीतील पेरणी ची कामे पुर्ण पणे झालेली आहेत .दरवर्षी शेतकरी राजा पांडुरंगा कडे काही तर साकडं घालत असतो काही तरी मागत असतो. अणि याच दृष्टीने टाळ मृदंगाच्या गजरात पंढरीचे वारकरी भक्त पंढरीच्या वाटेने दंग होतात.

बीड जिल्ह्यातील डोंगरेश्वर संस्थान येथील ह.भ.प.वै.महंत रामदास बाबा यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षापासून पंढरी चा पायी दिंडी सोहळा निर्विघ्न पणे पार पडत होता. आता संस्थान चे उत्तराधिकारी महंत पांडुरंग महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा पुढील मार्गे दिनांक. ५ जुलै २०२४ रोजी संस्थान वरुण पुढील मार्गे रवाना होईल. सोनेगाव, निपाणी, पाथरूड, इडापिडा, रुई, ढगपिंपरी, शिराळा, लवूळ, रानमळा,आणि मेंढापूर मुक्कामानंतर पंढरपूर नगरीत दिंडीचे आगमन होते. या मार्गेचा दिंडी प्रवासा १० दिवसांचा असतो.पायी दिंडी सोहळ्यात भावीक भक्तांचा दरवर्षी उदंड प्रतिसाद मिळत आहे तसेच ब्राह्मणगाव, मूर्ती, भीमसिंह गड वडवणी अणि तांदळवाडी येथील दिंड्या श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान पायी दिंडी सोहळ्यात सामील होतील.या सोहळ्या दरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे ही आयोजन करण्यात येते. दररोज भाविक पायी दिंडी सोहळ्याला जेवणाच्या पंगती देतात अन्नदानाचा महायज्ञ सुरू ठेवतात. यावर्षी हा पालखी सोहळा प्रस्थान दि.५ जुलै २०२४ ला सुरू होऊन श्री क्षेत्र पंढरपूर येथे १५ जुलै २०२४ रोजी सोमवारी पोहचणार आहे.श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिंडी थांबण्याचे ठिकाण वै महंत रामदास बाबा मठ शेगाव ( दु ) रोड पाण्याच्या टाकीजवळ पंढरपूर व श्री क्षेत्र पंढरपूर मध्ये पौर्णिमेपर्यंत दिंडी थांबेल व पौर्णिमेला काला करून परतीचा प्रवास सुरू होईल. आणि श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवण येथे दिंडीची सांगता होईल या पायी दिंडी सोहळ्यात सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती ह.भ.प. महंत पांडुरंग महाराज शास्त्री (डोंगरेश्वर संस्थान देवदरा यांनी केली आहे.


### जाहीरनामा
### धारुर येथील श्रीमती ए. बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर
### किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८८/२०२४
### यश व इतर २ विरुद्ध निरंक

अर्जदार यांनी मयत क्र. १ हरीश्चंद्र पिता मनाजी शिंदे मौजे धारूर ता.धारुर जि.बीड हे दिनांक ०९/०७/२०१० रोजी लाइफ लाइन हॉस्पीटल ऐरोली, नवी मुंबई येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत क्र. शारदा भ्र. हरीश्चंद्र शिंदे मौजे धारूर ता.धारुर जि. बीड हया दिनांक १४/१०/२००९ रोजी विष्णूनगर, दिघा, नवी मुंबई येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १. यश पिता हरिश्चंद्र शिंदे, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण रा. धारुर ता. धारुर जि.बीड ह.मू. विष्णू नगर बेलापूर रोड दिघा, ता. जि. ठाणे अ.पा.क. भाउ संतोष हरिश्चंद्र शिंदे, रा. सदर, अर्जदार क्र. २ संतोष पिता हरिश्चंद्र शिंदे, वय २९ वर्षे, धंदा शेती रा. सदर, अर्जदार क्र. ३ विनोद पिता हरिश्चंद्र शिंदे, वय २७ वर्षे, धंदा शेती रा. सदर यांनी अर्जदार क्र. १ ते ३ ही मयत क्र. १ व मयत क्र. २ यांची मुले या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत क्र. १ हरीश्चंद्र पिता मनाजी शिंदे आणि मयत क्र. शारदा भ्र. हरीश्चंद्र शिंदे यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांसा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत्त क्र. १ हरीश्चंद्र पिता मनाजी शिंदे आणि मयत क्र. शारदा प्र. हरीश्चंद्र शिंदे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: २०/०६/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : २९/०७/२०२४

स्वाक्षरित
सी. के. पवार
क लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
सहअधिक्षक
दिवाणी न्यायालय क .स्तर धारुर

# स्टेट बँकेच्या मॅनेजरला मस्तवालपणा भोवणार?

## वरिष्ठांनी दखल घेण्याची गरज

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील स्टेट बँकेचे मॅनेजर युवराज पाटील यांच्याकडून सतत तालुक्यातील शेतकऱ्यांसह इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांची अडवणूक करून निराधारांना हिन वागणूक देण्याच्या घटना घडल्या आहेत. अनेकदा राजकीय क्षेत्रातील व्यक्तींसोबत बाचाबाची चे प्रकारही घडून आले आहेत. इतर सर्वसामान्य खातेदारांनाही अनेकदा उडावा उडवीच्या उत्तरांना सामोरे जावे लागले आहे. या अगोदर अनेक अधिकारी होऊन गेले मात्र सर्वांना समान न्याय देण्याबरोबरच त्यांची अडवणूक होऊ नये म्हणून दक्षता घेतली जात होती. मात्र सध्या कार्यरत असलेल्या या बँकेच्या मॅनेजर मुळेच येथील बँकेची बदनामी होवु लागली असल्याचे चित्र दिसत आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे मॅनेजर युवराज पाटील यांच्या हेकेखोर पणामुळे ग्राहकांना, खातेदारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. हे मॅनेजर बँक म्हणजे स्वतःची मक्तेदारीच असल्याचा आव आणत असल्याने बँक कर्मचारीही कामात टाळाटाळ करण्याचे प्रकार वाढले आहेत. या बँकेतील

खातेदारांना कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची भाषा वापरण्याचे मोठे प्रकार घडले आहेत. दोन दोन तीन तीन वर्षे एकाच जागेवर काम करत असल्याने येथील

जुन्या कर्मचाऱ्यांना तातडीने या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविणे आवश्यक आहे. त्यामुळे आपली बँक चांगली बँक आपल्या हक्काची बँक हे अभिमानाने सांगण्यासाठी सोयीचे होईल.

### शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न विचारले असता उडवाउडवीची उत्तरे देतात – संतोष पवार

आम्ही आमच्या कामांपेक्षा शेतकऱ्यांच्या व इतर सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी बँकेत जात असतो.सहा सहा महिने शेतकऱ्यांच्या फाईल्स जागच्या जागी पडुन असतात.त्याची दखल घेतली जात आहे.काही महिन्यांपूर्वी आम्ही याबाबतीत विचारणा करण्यासाठी गेलो होतो.मात्र आम्हाला उलट सुलट उत्तरे दिली गेली.नाविलाजाने आम्हाला आंदोलनाचा इशारा द्यावा लागला. तेंव्हा कुठे या मॅनेजरला जाग आली आणि जी प्रकरणे प्रलंबित होती ती मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे आजही त्या वेळीचे पेंन्डीग प्रकरणे प्रलंबितच असल्याचे मत बंजारा युवा शक्ती चे अध्यक्ष संतोष पवार यांनी व्यक्त केले.

### शेतकऱ्यांच्या पिक कर्जासाठीही अडवणूक –शंकर चाटे

आम्ही सामाजिक कार्य करताना शेतकऱ्यांसाठी व जनसामान्य खातेदारांच्या हितासाठी सतत कोणत्या ना कोणत्या कार्यालयात जाऊन त्या शेतकऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असतो. मागील वेळी काही शेतकऱ्यांना येथील स्टेट बँकेच्या मार्फत पिककर्जाच्या फाईल साठी बँकेत जाण्याचा योग आला. त्यावेळी या मॅनेजर ने चक्क वेगळाच तोरा दाखवून दिला. गोर गरीब सर्वसामान्य शेतकरी राजा आपल्या शेतातील पिक कर्जासाठी किती गयावया करू लागलेला आहे. यांचं काही एक देणंघेणं या मॅनेजरला नसते. ते त्यांच्याच तो-यात असतात. आम्हाला मागील काही दिवसांपूर्वी या मॅनेजरचा अनुभव आला आहे. नक्कीच अशा अधिकाऱ्यांमुळे बँकेची बदनामी होवु लागली असुन या कुठेतरी आवर घालण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याची गरज असल्याचे मत जय भगवान महासंघाचे युवक जिल्हाप्रमुख शंकर चाटे यांनी व्यक्त केले.

# शहरातील स्वच्छता आणि पाणी प्रश्न गंभीर नगरपालिकेचे दुर्लक्ष –डॉ. ज्योतीताई मेटे

## लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त ‘‘कृतज्ञता सप्ताह‘‘ चे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये विविध सामाजिक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. यात दि.२६ बुधवार रोजी येथील कॅनॉल रोड, शाहूनगर परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यावेळी स्वच्छता मोहिमे दरम्यान रहिवासी, नागरिकांनी स्वच्छता आणि पाणी प्रश्ना संदर्भात भेडसावत असलेल्या समस्या डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्यासमोर मांडल्या नाले साफसफाई, स्वच्छता आणि पंधरा दिवसांनी होणाऱ्या





पाणीपुरवठ्यामुळे आमचे अतोनात हाल होत असल्याच्या भावना यावेळी नागरिकांनी उपस्थित केल्या.

लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांच्या ३० जून रोजी होत असलेल्या जयंतीनिमित्त त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांनी आणि शिवसंग्रामच्या मावळ्यांनी

### स्वच्छता अभियानादरम्यान नागरिकांनी डॉ.ज्योती मेटे यांच्यासमोर मांडल्या समस्या

कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन केले आहे. यात समाज उपयोगी उपक्रम राबवत हा सप्ताह साजरा करण्याचा मानस आहे. बुधवार रोजी बीड येथील कॅनॉल रोड, शाहूनगर येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. यावेळी नागरिकांनी दैनंदिन जीवनात भेडसावत असलेल्या समस्या डॉ. ज्योती मेटे यांच्यासमोर मांडल्या नगरपालिका प्रशासनाकडून नालेसफाई आणि स्वच्छतेकडे सपशेल दुर्लक्ष केले जात असून यामुळे रोगराई पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पंधरा दिवसाला होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी ◀◀ पान ३ वर

# उपमुख्यमंत्री अजितदादांच्या वाढदिवसानिमित्त गेवराईत मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन

## दिव्यांग बंधुंनी लाभ घेण्याचे विजयसिंह पंडित यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दि.२८ जुलै २०२४ रोजी र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे (आर्टिफिशियल लिम्ब कॅम्प) आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात गरजू दिव्यांगांना अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम हात व पाय मोफत बसवून दिले जाणार आहेत. गरजू दिव्यांगांनी नोंदणी करून शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार



यांच्या वाढदिवसानिमित्त जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन केले आहे. शारदा प्रतिष्ठान गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबीरात अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित, अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम अवयव उपलब्ध करून दिले जाणार आहेत. कृत्रिम अवयव लावल्यानंतर मनुष्य चालू शकणार आहे, टेकडी चढू शकतो, सर्व दैनंदिन कामे करू शकतो त्याचबरोबर सायकल सुध्दा चालवू शकतो. त्यामुळे या सुवर्ण संधीचा लाभ गरजू दिव्यांगांनी घ्यावा असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

नोंदणीसाठी अशोक तौर मो.९४२३७१४८४७, बाबु वादे मो. ७५८८६३५११२ आणि सत्यप्रेम लगड मो.९४२०४२२२२४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

रविवार, दि.२८ जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आयोजित या शिबीरात तज्ञांकडून केवळ हात ◀◀ पान ३ वर

# सातबारा, फेरफार सर्व्हरमुळे शेतकरी त्रस्त

### सर्व्हर प्रॉब्लेम दुर करण्याची तलाठी संघटनेची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

खरीप हंगाम सुरु झाल्यानंतर शेतकरी पीक कर्ज व पीक विमा व इतर कामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सातबारा,फेरफार नक्कलची गरज भासते.परंतु सदर महिनाभरात वारंवार सातबारा,फेरफार सर्व्हर कधी स्लो तर कधी बंद असल्याने शेतकरी वर्गाची कामे खोळंबत आहेत.सदर सर्व्हर प्रॉब्लेम लवकरात लवकर दुर करून सर्व्हर स्पीड पूर्ववत करून देण्याची मागणी तलाठी संघटनेच्या वतीने माजलगाव तहसीलदार मार्फत शासनाकडे केली आहे.

यासंदर्भात तलाठी संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना दि २५



जुन मंगळवार रोजी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, खरीप हंगाम सुरु झाल्यानंतर शेतकरी पीक कर्ज व पीक विमा व इतर कामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सातबारा,फेरफार नक्कलची गरज भासते.परंतु सदर महिनाभरात वारंवार सातबारा,फेरफार सर्व्हर कधी स्लो तर कधी बंद असल्याने शेतकरी वर्गाची कामे खोळंबत आहेत.सदर सर्व्हर प्रॉब्लेम लवकरात लवकर दुर करून सर्व्हर स्पीड पूर्ववत करून देण्याची मागणी तलाठी संघटनेच्या वतीने माजलगाव तहसीलदार मार्फत शासनाकडे केली आहे.सातबारा,फेरफार सर्व्हर व्यवस्थित चालले तर शेतकऱ्यांची कामे योग्य वेळेत होतील. त्यामुळे शासनाने सर्व्हर, वेबसाईटची समस्या लवकरात लवकर दुर करून शेतकरी वर्गास दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गातूनही होत आहे.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा आष्टी शहरात हैदोस; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

आष्टी । प्रतिनिधी

कालपासून आष्टी शहरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने हैदोस मांडला आहे. सोमवार (ता.२४) रोजी सायंकाळी अहमदनगर-बीड मार्गावर असलेल्या एका वॉशिंग सेंटर येथे काम करणाऱ्या मुस्तफा सय्यद नावाच्या व्यक्तीला या पिसाळलेल्या कुत्र्याने सर्वात प्रथम चावा घेतला. यानंतर बस स्थानक परिसरात येऊन तेथील दोन प्रवाशांना तर पुढे मानवी वसाहत असलेल्या संजीर बावरे, बाबासाहेब चव्हाण, आदित्य गिऱ्हे,नामक इसमाला या पिसाळलेल्या कुत्र्याने जबर चावा घेतला असल्याची घटना घडली आहे. तांबड्या रंगाच्या कुत्र्याने सहा लोकांना जबर चावा घेतला आहे.

शहरातील विविध ठिकाणी सदरील पिसाळलेल्या कुत्र्याने अनेकांना चावा घेऊन बाधित केले आहे. घटनेची माहिती समजताच नगरसेवक नाजीम शेख यांनी काल रात्री बाधित रुग्णांवर आष्टी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले व प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अहमदनगर जिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले आहे.

नगरसेवक नाजीम शेख यांची सतर्कता

काल रात्री पिसाळलेल्या कुत्र्याने सर्वात प्रथम चावा घेतलेल्या मुस्तफा शेख यांनी घटनेची माहिती नगरसेवक नाजीम शेख यांना दिली असता नाजीम शेख यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाहन केल्याने नागरिक सतर्क झाले.

# नारायणगड संचलित वस्तीगृहाकडे जाणाऱ्या सिमेंट रोडचे काम सुरू

## महंत शिवाजी महाराज, डॉ.योगेश क्षीरसागरांच्या हस्ते भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या काकडहिरा शिवारात श्री क्षेत्र नारायण गड संस्थान संचलित विद्यार्थी वसतिगृह आहे. या वसतिगृहाकडे जायला पक्का रस्ता नव्हता. याची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून दिला. दरम्यान, सोमवारी (दि.२४) महंत ह.भ.प. शिवाजी महाराजांच्या हस्ते सिमेंट रस्त्याचे भूमिपुजन करण्यात आले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड शहरापासून जवळच



असलेल्या नगर रोडवर क्षेत्र नारायण गडाच्यावतीने गोरगरिब विद्यार्थ्यांसाठी भव्य असे वसतिगृह उभारले आहे. वसतिगृह उभारले मात्र मुख्य रस्त्यापासून वसतिगृहाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नव्हता. गत महिन्यात गडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज व नारायण गड संस्थानच्यावतीने वसतिगृहाकडे जाणार्या सिमेंट रस्त्याची मागणी करण्यात आली होती. या ◀◀ पान ३ वर

# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या धारूर शाखेला पोलिसांनी ठोकले सील

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यापासून ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये झालेल्या गैर व्यवहारामुळे बँकेचे चेरमन सुरेश कुटे यांच्या विरोधात गुन्हे दाखल झाले होते त्या अनुषंगाने काही दिवसांपूर्वी सुरेश कुटे यांना पोलिसांनी अटक केली आहे बँकेत झालेल्या गैरव्यवहाराची पोलीसा मार्फत चौकशी सुरू आहे त्या अनुषंगाने धारूर पोलिसांनी आज धारूर ज्ञानराधा मल्टीस्टेट शाखेला सील कले.

धारूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद होता त्या नुसार आज पुढील तपासा साठी बँकेच्या कार्यालयाला पोलिसांच्या वतीने शासकीय सील लावण्यात आले.धारूर येतील ज्ञानराधा शाखेमध्ये शारतील व तालुक्यातील छोटे व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी यांनी ठेवी जमा केल्या आहेत आज ते मोठ्या आर्थिक संकटामध्ये असून सावकाराकडून पैसे घेऊन पेरणी केली आहे मुलीचे लग्न दवाखाना अशा अनेक समस्येने ठेवीदार अडचणीमध्ये सापडले आहेत यात शासनाने तात्काळ पावले उचलून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळवून द्याव्यात अशा भावना ठेविदार व्यक्त करत आहेत.

# पाणंद रस्त्याच्या नावाखाली आष्टी तालुक्यात बोगस बिले उचलण्याचा प्रकार

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतीला लागणारी यंत्रसामग्री शेतापर्यंत नेणे, शेतकऱ्यांनी पिकविलेला माल बाजारात पोचविणे यासह निकडीच्या बाबी सुकर होण्यासाठी आणि बारमाही शेतरस्त्यांच्या (पाणंद) कामांना गती देण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

याच माध्यमातून आष्टी तालुक्यात जवळपास ६२० हून अधिक पाणंद रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली.मात्र बोटावर मोजण्या इतकेच पाणंद रस्त्यांचे पूर्ण झालेले काम सोडता एक टोपले देखील न टाकताच



### सखोल चौकशीची दरेकर यांची मागणी

स्थानिक प्रशासना सोबत आर्थिक तडजोड करून तालुक्यात न झालेल्या कामांचे बील अदा करण्याचा सपाटा स्थानिक प्रशासनाने लावल्याचे विदारक चित्र आष्टी तालुक्यात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसे शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.

सध्या महायुतीचे सरकार असल्याने कोट्यवधीचा आलेला पाणंद रस्त्यांसाठीचा निधी प्रशासनाला हाताशी धरून कार्यकर्त्यांचे खिसे भरण्यासाठी कागदावर काम सुरू असल्याचे दाखवत वितरित करण्याचा सपाटा स्थानिक प्रशासनाने लावला असल्याचे विदारक चित्र आहे.प्रत्यक्षात मात्र बोटावर मोजता येतील इतकीच कामे पूर्ण असून मोठ्या प्रमाणावर जिथे शून्य काम झालेले आहे अशा कामावरचा निधी प्रशासकिय अधिकारी यांना हाताशी धरून कार्यकर्त्यांनी खिशात घातल्याने प्रशासन देखील या घोटाळ्यात आपले खिसे भरून घेत आहे की काय? असा सवाल दरेकर यांनी उपस्थित केला आहे.त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून प्रशासनातील जे अधिकारी यात दोषी ◀◀ पान ३ वर

# आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते विजय हजारे यांचे निधन

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते विजय हजारे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने मुंबई येथे उपचारा दरम्यान निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर आज दि २७ रोजी सकाळी साडे आठ वाजता परळीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



विजय हजारे हे फुले, शाहू ,आंबेडकरी चळवळीत सक्रिय होते.अनेक सामाजिक आंदोलनात त्यांचा सहभाग होता.गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते.त्यांच्यावर मुंबई येथील केईएम रुग्णालयात उपचार सुरू होते.उपचारा दरम्यान त्यांचे आज बुधवार रोजी सकाळी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर उद्या गुरुवारी सकाळी साडे आठ वाजता भीमनगर येथील शांतीवन स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक बहीण, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शरद पवारांपाठोपाठ राहुल गांधीही ज्ञानोबा तुकारामाचा गजर करणार, पंढरीच्या वारीत पायी चालणार?

**पुणे । प्रतिनिधी**



अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या पंढरपूरच्या विठुरायाचा आशीर्वाद पदरात पाडून घेण्यासाठी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. येत्या १७ जुलैला आषाढी एकादशी आहे. त्यासाठी राज्यभरातून संतांच्या पालख्या या पंढरपूरला जात असतात. पंढरीला जाणारी आषाढी वारी ही महाराष्ट्रातील अनेक वर्षांपासून चालत आलेली महत्त्वाची परंपरा राहिली आहे. पंढरीची वारी हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सोहळा मानला जातो. या वारीत आता राहुल गांधीही सहभागी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

काँग्रेस पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, राहुल गांधी हे पंढरीच्या आषाढी वारीत सहभागी होण्याविषयी विचार करत आहेत. राज्यात येत्या तीन-चार महिन्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी हे पंढरीच्या वारीत सहभागी झाल्यास काँग्रेस पक्षासाठी ते फायदेशीर ठरु शकते. राहुल गांधी यांनी यापूर्वी भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने हजारो किलोमीटरची पायपीट केली आहे. त्यामुळे पंढरीच्या वारीत चालणे त्यांच्यासाठी सहजसोपी गोष्ट ठरु शकते.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात सर्वाधिक १३ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे काँग्रेस पक्षात नवचैतन्य संचारले आहे. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी राहुल गांधी पंढरीच्या वारीत सहभागी झाल्यास त्यांना हजारो वारकरी आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचता येईल. तसेच यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा उत्साहदेखील कैकपटीने वाढू शकतो. त्यामुळे आता राहुल गांधी खरोखरच पंढरीच्या वारीत चालणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

राहुल गांधी पंढरपुरात जाऊन विठुरायाचे दर्शन घेणार

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने काँग्रेसच्या झोळीत भरभरून १३ जागांचे दान दिल्यानंतर आता महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्सव असणाऱ्या आषाढी सोहळ्यासाठी लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी हे १३ किंवा १४ जुलै रोजी पंढरपुरात येऊन विठुरायाचे दर्शन घेणार आहेत . याबाबत काँग्रेसच्या एका जेष्ठ नेत्याने यास दुजोरा दिला असून १७ जुलै रोजी आषाढी एकादशीचा महासोहळा असल्याने त्यापूर्वी १३ किंवा १४ जुलै रोजी राहुल गांधी विठ्ठल मंदिरात येऊन दर्शन घेणार आहेत . त्यापूर्वी पालखी सोहळ्यासोबत चालण्याचा आनंदही त्यांना घ्यायचा असून याबाबत देखील प्रयत्न करण्यास सुरुवात झाली आहे . यावेळी पालखी सोहळे हे माळशिरस तालुक्यात असणार असून यावेळी माळशिरस ते वेळापूर या मार्गावर राहुल गांधी वारकऱ्यांसोबत वारीत सहभागी होण्याची शक्यता आहे .

शरद पवार पायी वारीत सहभागी होणार

ढरपूरला जाणाऱ्या आषाढी पालखी सोहळ्यात 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' हा उपक्रम राबविला जातो. साहित्यिक, विचारवंत, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, कलावंत यांचा या वारीत सहभाग असतो. यंदा शरद पवार या वारीत सहभागी होणार आहेत. बारामती ते इंदापूरच्या सणसरपर्यंतचे तब्बल १७ किलोमीटरचे अंतर शरद पवार पायी चालणार आहेत. संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात ७ जुलै रोजी ही मंडळी बारामती ते सणसर हे अंतर चालणार आहेत. शरद पवार आणि राहुल गांधी हे दोन बडे नेते वारीत सहभागी झाल्यास मोठे राजकीय शक्तीप्रदर्शन होऊ शकते.

# कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पुण्यात तब्बल १४४ रेस्टॉरंटवर बुलडोझर

पुणे : कल्याणीनगर येथील अपघातानंतर रेस्टॉरंट, पबसाठी केलेल्या अनधिकृत बांधकामाचा प्रश्नही ऐरणीवर आल्याने महापालिकेने गेल्या महिन्याभरात ८५ रुफटॉप आणि ५५ तळमजल्यावरील रेस्टॉरंट, पबवर कारवाई करून ३ लाख ६० हजार चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकले आहे. तर, अनधिकृत बांधकाम केल्याने २१ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.



शहरातील इमारतींच्या गच्चीवर रुफटॉप हॉटेल सुरु करण्याचा प्रकार सर्रास सुरु झाला आहे. बाणेर, बालेवाडी, कोथरूड, खराडी, वडगाव शेरी, डेक्कन जिमखाना, शिवाजीनगर, कोरेगाव पार्क, हडपसर, बिबवेवाडी, महंमदवाडी, सिंहगड रस्ता आदी भागात रुफ टॉप हॉटेलचे मोठे पेव फुटले आहे. अनधिकृत बांधकाम असूनही तेथे राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे दारू विक्रीचा परवाना देण्यात येत आहे.

मंजूर टेबल, खुर्च्यांपेक्षा व निश्चित केलेल्या ठिकाणाशिवाय हॉटेलच्या आवारात इतरत्र दारू विक्री केली जात आहे. या हॉटेलमुळे निवासी भागात रात्री उशिरापर्यंत गोंधळ व वाहतूक कोंडी होत आहे. त्याबाबत अनेक तक्रारी येऊन देखील महापालिका, पोलिसांकडून कारवाई केली जात नव्हती. कल्याणीनगर येथे मद्यधुंद अल्पवयीन मुलाने महागडी पोर्शे गाडी चालवून दोघांचा बळी घेतला, याप्रकरणानंतर शहरातील रुफ टॉप हॉटेल, रेस्टॉरंटवर कारवाई सुरु झाली. बांधकाम विभागाने पुणे पोलिसांना ८९ अनधिकृत रुफटॉपची माहिती दिली होती. पोलिसांनी त्यावर कारवाई केली नाही, अखेर महापालिकेनेच कारवाई सुरु करून त्यापैकी ८५ ठिकाणी कारवाई पूर्ण केली आहे. तर तळ मजल्यावर सुरु असलेल्या ५९ हॉटेलवरही बुलडोझर चढवून अनधिकृत बांधकाम, शेड पाडून टाकले आहे. वारंवार अनधिकृत बांधकाम करून हॉटेल सुरु करणाऱ्या हॉटेल मालकांवर गुन्हा दाखल करण्यासाठी महापालिकेने अनेक तक्रारी दिल्या आहेत. त्यापैकी केवळ २१ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# मोई सोसायटीच्या अध्यक्षपदी फलके

कुरुळी । प्रतिनिधी



मोई विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी काळूराम तुकाराम फलके यांची बिनविरोध निवड झाली. सोसायटीचे माजी अध्यक्ष भगवान साकोरे यांनी सर्व संचालक काम करण्याची संधी मिळावी म्हणून, राजीनामा दिल्याने रिक्त असलेल्या जागेसाठी निवडणूक घेण्यात आली. एकमेव अर्ज फलके यांनी दाखल केल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी एस. एम. बागटे, सचिव नीलेश देशमुख यांनी जाहीर केले.

खेड तालुक्यातील मोई ग्रामस्थांनी सोसायटी पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध करण्याचा एकमुखी निर्णय घेऊन दानशूर शेतकऱ्यांना सोसायटीवर काम करण्याची संधी मिळावी म्हणून, ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या मंदिरातील बैठकीत निर्णय झाला.

उपाध्यक्षा सुरेखा करपे, सोसायटी माजी अध्यक्ष भगवान साकोरे, संभाजी करपे, ज्ञानेश्वर गवारे, संभाजी गवारे, जालिंदर गवारे, जीवन येळवंडे, समीर गवारे, आनंद गवारे, मनीषा गवारे, रवी गवारे, चेतन गवारे, संचालक निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी होते.याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कैलास लिभोरे, माजी उपसरपंच गोरख गवारे, गणेश गवारे, चंद्रकांत गवारे, गोरख फलके आदी मान्यवर उपस्थित होते.

# अंत पाहू नका, अन्यथा दादागिरी काय असते ते दाखवून देऊ; पुणे पोलीस आयुक्तांचा दम

पुणे : पुणे पोलिसांचा अंत पाहू नका... सुरुवातीला हात जोडू पण संयम तुटला तर कडक कारवाई करु असा सज्जड दम पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलाय. आमची दादागिरी काय असते ते तुम्हाला दाखवू असा इशारा अवैध व्यावसाय करणाऱ्यांना दिला आहे. गेल्या काही दिवसात ड्रग्ज प्रकरण, अनाधिकृत पब, अवैध धंदे समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर अमितेश कुमारांनी कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नागरी संवादाचे आयोजन पुण्यात केले होते. सामाजित सलोखा, वाढती बाल गुन्हेगारी, वाढती व्यसनाधीनता आणि कायदा सुव्यवस्तेबाबत आयुक्तांनी संवाद साधला. तसेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून अवैध धंदा करणाऱ्यांना तंबी दिली आहे. मारहाण करणे त्याचे व्हिडीओ काढून सोशल मीडियावर टाकत दहशत निर्माण




करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शांतता अबाधित राहण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे. पुणे पोलिसांचा संयम तुटला तर कडक कारवाई करण्यात येईल. येरवड्यात आंतर्धमीय विवाहवरून झालेला खून यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर अमितेश कुमार बोलत होते. गुन्हेगारांना चाप लावण्यासाठी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हेगारी टोळ्या आणि सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले आहेत.

कठोर कारवाईचा इशारा

पुण्यातील नामचीन गुंडांचे किंवा त्यांच्या भाईंच्या नावाने अनेक अकाउंट बनवले आहेत आणि याच अकाउंटवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची करडी नजर आहे. कुठल्या ही गुन्हेगारीचे उदात्तीकरण करत असल्याच्या पोस्ट किंवा व्हिडीओ दिसले तर ते अकाउंट तर सस्पेंड होईलच पण ते चालवणारे तरुणांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

आयुक्तांचे चॅलेंज

पोर्शे कार अपघात, कोयता गँगची दहशत, त्यानंतर ड्रग्ज प्रकरण या घटनेनंतर पुणे पाोलीस आयुक्तांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. विरोधकांनी पुणे पाोलीस आयुक्तांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिस आयुक्त अमितशे कुमार यांनी पत्रकार परिषद घेत आपली बाजू मांडली आहे. तसंच पुणे पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न विचारणाऱ्यांना आयुक्तांचं बेधडक आव्हान दिले आहे. पुणे पोलिसांनी घेतलेल्या भूमिकेपेक्षा आणखी जास्त कडक भूमिका कोणी सुचवत असेल तर त्यांच्याशी चर्चा करण्याची आमची तयारी आहे, असे चँलेज त्यांनी दिले होते.

# अल्पवयीन मुलांचे नको ते प्रताप, पालकांनी उचलले मोठं पाऊल; लेकरांच्या मागे लावले चक्क 'डिटेक्टिव्ह'

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातील पोर्शे कार अपघातात अल्पवयीन मुलगा कारणीभूत असल्याचं समोर आल आणि आता ऋउ रोड वरील ड्रग्ज प्रकारणातदेखील काही अल्पवयीन मुलांचा समावेश असल्याचा पोलिसांचा संशय आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलांमधीला नशेचा मुद्दा किती गंभीर आहे? हे पुन्हा एकदा स्पष्ट झालंय आणि त्यामुळेच पुण्यातील अनेक पालांनी त्यांचा अल्पवयीन मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी डिटेक्टिवची मदत घायचं ठरवलंय. गेल्या काही दिवसात अनेक पालकांनी डिटेक्टिव्हशी संपर्क साधल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील ऋउ रोडवरील ङ३ लाउंजमध्ये ड्रग्ज घेणारे पार्टीत अल्पवयीन मुलं सहभागी झाले होते, असाही दावा केला जात आहे. त्यामुळे दारू किंवा कोकेनसारखे अमली पदार्थ असेल अल्पवयीन मूलं नशेच्या आहारी जात असल्याचं पुन्हा एकदा स्पष्ट झालंय. कल्याणी नगर अपघातातदेखील विशाल आणि शिवनी अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगाच कारणीभूत ठरला होता. त्यामुळे पुण्यातील अंमली पदार्थाचा हा विळखा आपल्या मुलांवर पडू नये, यासाठी अनेक पालक डिटेक्टिव्हची मदत घेत आहेत.

पाल्यांवर नजर ठेवण्यासाठी डिटेक्टिव्हची मदत

अल्पवयीन मुलं शाळा आणि महाविद्यालयात शिकणारी आहेत. या मुलांवर ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने लक्ष ठेवणं, त्यांच्या मागावर काही लोक पाठवणं आणि त्यांच्या मित्रमंडळी कोण आहे याची माहिती घेणं, ही सगळी आव्हान या डिटेक्टिव्ह समोर आहे. अनेक मुलांचा पाठलाग करण्याचं, त्यांच्या हालचालींकडे लक्ष ठेवण्याचं काम डिटेक्टिव्ह एजन्सी करते. मुळात आपल्या पाल्यांवर नजर ठेवण्यासाठी डिटेक्टिव्हची मदत घायला लागणंच हे आपल्या बदललेल्या समाज व्यवस्थेचं आणि कुटुंब व्यवस्था किती बदलली आहे हे दर्शवणार आहे. मात्र डिटेक्टिव्ह एजन्सीची मदत घेण्याबरोबरच या पालकांनी आपल्या मुलांवर लहानपणापासून मुळात चांगले संस्कार कारणं आणि दक्षता घेण्याची देखील गरज आहे.

पालकांवर दुर्दैवी वेळ

पाठलाग करण्यासाठी मुलांच्या मागावर काही लोक पाठवणं, मुलं कुठे जातात, काय करतात आणि त्यांची मित्रमंडळी कोण? याची बारीक माहिती घेणं, ही आव्हानं या डिटेक्टिव्ह समोर असणार आहेत. मुळात आपल्या पोटचा गोळा असणाऱ्या मुलांवर नजर ठेवण्यासाठी डिटेक्टिव्ह नेमावे लागणं, ही दुर्दैवी वेळ पालकांवर येऊन ठेपलीयबदललेल्या समाजव्यवस्थेची, कुटुंबव्यवस्थेची तसेच मुलांवर केल्या जाणाऱ्या संस्कारांचीही खऱ्या अर्थाने परीक्षाच आहे. ज्याचा निकाल फक्त पालकांच्या हाती आहे.

# फर्ग्युसन रोडवरील 'एल थ्री'मधील पार्टीसाठी कुठून झाला ड्रग्जचा पुरवठा? धक्कादायक माहिती आली समोर

**पुणे । प्रतिनिधी**

नामदार गोपाळकृष्ण गोखले पथावर (फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता) असलेल्या लिक्विड लीजर लाउंज (एल थ्री) बारमध्ये झालेल्या पार्टीतील तरुणांना अमली पदर्थांचा पुरवठा पुण्यातूनच झाला होता. पोलिसांच्या प्राथमिक तपासातून ही बाब समोर आली आहे. यापूर्वी पोलिसांनी हे अमली पदार्थ पार्टीत सहभागी झालेल्या तरुणाने मुंबईतून आणल्याचा अंदाज व्यक्त केला होता.



याप्रकरणी पुणे पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. त्यातील एक तरुण मुंबईचा असून त्याने पार्टीसाठी मुंबईतून मेफेड्रोन आणल्याचे तपासात निष्पन्न झाले, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली होती. नितीन ठोंबरे (वय ३४, रा. गोरेगाव, मुंबई) आणि करण मिश्रा (वय ३४, रा. मुंढवा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. ठोंबरे हा वास्तुविशारद म्हणून काम करतो. तर मिश्रा हा एका नामांकित कंपनीत संगणक अभियंता आहे. ठोंबरे आणि मिश्रा हे दोघे मित्र आहेत. त्यांच्याकडे प्राथमिक चौकशी केल्यानंतर त्यांनी पार्टीत अमली पदार्थांचे सेवन केल्याची कबुली दिली आहे.

या प्रकरणात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यात अमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायद्यानुसार (एनडीपीएस) कलमवाढ करण्यात आल्याचे पोलिस उपायुक्त संदीपसिंह गिल यांनी सांगितले. पोलिसांनी आतापर्यंत या गुन्ह्यात १० जणांना अटक केली आहे. तर पार्टीत सहभागी झालेल्या नऊ जणांचा शोध घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली गेली आहे. तसेच, त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. कल्याणीनगर अपघातानंतर शहरातील पबवर कडक कारवाईचे धोरण प्रशासनाने राबवले आहे. वेळेतच पब बंद केले जात आहेत. परंतु, त्यानंतर फर्ग्युसन रस्त्यावरील एल थ्री रेस्टॉरंटमध्ये झालेल्या पार्टीत अमली पदार्थाचा वापर झाल्याची बाब समोर आल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे.

पार्टीच्या आयोजनात व्हॉट्सअप ग्रुप व इंस्टाग्रामचा वापर

कल्ट येथून एल-थ्री रेस्टॉरंटमध्ये पार्टीसाठी आलेल्या लोकांनी पुणे वाईब्स नावाने व्हाटस्ॲप ग्रुप तयार केला होता. त्या ग्रुपच्या माध्यमातून पार्टीची माहिती एकमेकांना देण्यात आल्याचे पुढे आले आहे. बारमध्ये पार्टीचे आयोजन करण्यात व्हॉट्सअप ग्रुप तसेच इंस्टाग्रामचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यासाठी ग्रुप काढला जातो. त्यातून पार्टी आयोजित केली असल्याची माहिती दिली जाते. त्यामुळे पोलिसांकडून यावर नजर ठेवली जात असल्याची माहिती देण्यात आली.

# मुख्यमंत्री शिंदेंच्या आदेशानंतर बाणेर, कोरेगाव पार्कमधील अनधिकृत हॉटेल जमीनदोस्त; पुण्यात १९ ठिकाणी कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

बाणेर, बालेवाडी, कोरेगाव पार्क भागात अनेक अनधिकृत रेस्टॉरंट, बार, रुफटॉप हॉटेल सुरु झाले आहेत. पण, त्यांच्यावर कारवाई केली जात नव्हती. मात्र, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच अनधिकृत पब, बारवर बुलडोझर चढवा, असा आदेश काढल्यानंतर महापालिकेला अनधिकृत बांधकाम केलेली हॉटेल सापडण्यास सुरुवात झाली आहे. आज दिवसभरात १९ ठिकाणी कारवाई करून ५६ हजार ६१ चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकण्यात आले आहे.



शहरातील बडे उद्योगपती, लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या निकटवर्तीयांनी शहरात अनधिकृत बांधकामे करून हॉटेल, रेस्टॉरंट, पब सुरु केले आहेत. पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभाग, महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने तेथे बिनधास्तपणे पहाटेपर्यंत दारूविक्री केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या तरी त्याची कोणीच दखल घेत नव्हते.

गोपाळकृष्ण गोखले रस्त्यावरील एल थ्री पबमध्ये पहाटेपर्यंत पार्टी सुरु असल्याचे समोर आले. तेथे अंमलीपदार्थांचे सेवनही करण्यात आल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या तोंडावर पुण्यात खुलेआम ड्रग्ज पार्टी होत असल्याचे समोर आल्याने राज्य सरकारची डोकेदुखी वाढली. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनीच कडक कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर महापालिकेने मंगळवारी (ता. २५) २९ ठिकाणी कारवाई करून ३६ हजार ८४५ चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकले. त्यानंतर आज (ता. २६) १९ ठिकाणी कारवाई करून रेस्टॉरंट, बारचे ५० हजार ६१ चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकले.

हे आहेत कारवाई झालेले रेस्टॉरंट

बाणेर-बालेवाडी : द कार्नर लाऊंज बार, एमएल सिटोबार, ईस्को बार, इलीफ्ट बार, ब्रीव्ह मर्चंट कॅफे, उरबो किचन बार, नेटीव बार, फिलेमिट बार, थ्रीमिस्टेक टर्स, डॉक यार्ड. कोरेगाव पार्क : ग्रेडमामस, दबाबा शाब, प्रिम रेस्टॉरंट, टेल्ली बार, शिवाजीनगर सोशल हॉटेल आदी ठिकाणी कारवाई करून ५६ हजार ६१ चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकले.

आमचे हात बांधले गेले होते

शहरात अनधिकृत पब, बार, रेस्टॉरंट सुरु आहेत, रुपटॉप हॉटेल अनधिकृत आहेत हे माहिती आहे. तेथे कारवाईसाठी गेले की अनेक मोठे नेते फोन करून कारवाई थांबविण्यास सांगतात. आमच्यावर दबाव आणतात. अनेक ठिकाणी कारवाई करता आली नाही, तेथे केली त्यातील काही ठिकाणी अर्धवटच कारवाई झाली. त्यामुळे माहिती असूनही बांधकाम पाडता येत नाही. आमचे हात बांधले गेलेले असतात. मात्र, अशा घटना घडल्यानंतर आम्हाला कारवाई करण्याची मोकळीक मिळते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

## शेतकऱ्यांच्या अडचणींसाठी आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापना

**पुणे । प्रतिनिधी**

बियाणे, खते, कीटकनाशकांच्या पुरवठ्यासंदर्भातील तक्रारीसाठी आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शेतकरी बांधव यांनी यावर तक्रार करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

बियाणे विक्री करणारी केंद्रे, विशिष्ट कंपनीचे खत किंवा बियाणे खरेदी करण्याची सक्ती करत असतील अथवा चढ्या भावाने विक्री करत असेल तसेच बियाणे, खते, कीटकनाशके आदींच्या खरेदीबाबत आपली तक्रार असेल तर ती व्हाट्सऍप क्रमांकावर उपलब्ध असलेल्या पुराव्यासह पाठवावी; त्यावर शहानिशा करून तात्काळ कारवाई करण्यात येईल, तसेच तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू-भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. यासाठी

१८००२३३४००० हा टोल फ्री क्रमांक आणि लेपीीश्रें.लिं.रहरींरिहींरसारळश्र.ले या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी याची दखल घेत आपल्या ज्या तक्रारी आहेत त्या नोंदविणे आवश्यक आहे.